नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

१, अंक ४

ट १९६५

५० पैसे



या अंकात

अनुक्रमणिका

लो. बाळ गंगाधर टिळक

स्मृति सौरभ



भाषेची अभिवृद्धी करणे जर इष्ट असेल तर एखाद्या पंडिताने धात्वर्थापासू. अनेक काल्पनिक शब्द निर्माण करून त्यांचा कोश बनविल्याने कार्यसिद्धी व्हावयाची नाही. एखाद्या कृपणाने कोटचावधी रुपये संग्रह करून पुरून ठेवल्याने देशाच्या संपत्तीची जशी अभिवृद्धी होत नाही त्याप्रमाणेच भाषेतील शब्दांचा प्रकार होय. अर्थशास्त्रातील विनिमयाचा व्यवहार सुरळीत चालण्यास किंवा वाढविण्यास ज्या प्रमाणे व जितकी नाण्याची जरूर लागते, त्याप्रमाणे व तितकीच मनुष्य जातीच्या मनोवृत्ती व विचार परस्परास कळविण्यास शब्दांची जरुरी आहे आणि देशातील व्यापार वाढला असता ज्याप्रमाणे अधिक नाणे—मग ते धातूचे असो वा कागदी असो—उपयोगात आणणे जरूर पडते, त्याप्रमाणेच समाजात एकमेकाच्या विचारांचे दळणवळण वाढविण्यास शब्दांची जरूरी लागते. जगातील सर्व मनुष्यांची भाषा जर एक असती तर मनुष्यजातीपैकी एका भागाची सुधारणा झाल्याने सर्व भाषेची एकदम सुधारणा झाली असती. पण आजपर्यंतच्या इतिहासाच्या अनुभवावरून असा नियम दिसून येतो की, धर्म व भाषा या दोन्ही गोष्टी सर्व जगभर एकरूपाने कधीही असू शकत नाहीत. व मानवजातीच्या प्रारंभकाळी त्या एक होत्या असे जरी मानले, किंवा आजमितीस यक्षिणीची कांडी फिरवून त्या सर्व जगभर जरी एक करता आल्या, तरी कालांतराने या दोन्ही गोष्टींस देशभेदाने भिन्नभिन्न स्वरूप प्राप्त व्हावयाचेच.

—लो. बाळ गंगाधर टिळक

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक
मा. नी. गलगलीकर

वर्ष २०]   ऑगस्ट १९६५   [अंक ४

देवानां प्रिय

कै. गो. रा. दोडके

पडदा उघडण्याअगोदर काही जाणत्या माणसांची पावलं व काही शब्दांची देवघेव ऐकू येते. स्पष्ट शब्द प्रेक्षकांच्या कानावर येतात ते एवढेच,

—महाराज आपण विश्रांती घ्या. आम्ही जातो आता. आजचा दिवस—

नंतर थोडा वेळपावेतो सगळं शांत, मग

—मजा आली, माणसं अशी कापून काढली वीरगुप्ता की, बस् रे बस्.

पुन्हा थोडा वेळ शांतता, नंतर विव्हळणं, आर्तचीत्कार आणि खालील उद्गार ऐकू येतात,

—आयाईग ! देवारे ! अरे कुणी मारून टाकारे मला, घ्या जीव तुमच्या पाया पडतो, करारे मला मुक्त, नाही यातना सहन करवत आता,

वेगळा आवाज.

—चूप, चूप. बायकोप्रमाणे ओरडतोस काय ?

शांतता.

पडदा उघडतो. मौर्य सम्राटाच्या तंबूमधील दालन. झोपण्याच्या तयारीत अशोक आहे. कृतकृत्यतेचा आनंद मुद्रेवर झळकतो आहे. रात्र झोपण्याकरिता आणि म्हणूनच त्याच्या मनात झोपण्याचा विचार येतो आहे. नाहीतर कलिंग विजयाचा आनंद अंतःकरणात तुडूंब भरलेला असल्यामुळे झोपण्यापूर्वी मनाला जी स्वस्थता हवी असते ती त्याला मिळू शकत नाही. तो समईजवळ जातो, दिव्याच्या

अनुक्रमणिका

ज्योतीकडे निरखून पाहतो. नंतर भिंतीला टांगलेल्या ढाल तलवारीकडे बघतो. नंतर तंबूच्या दाराजवळ येऊन दाराबाहेर डोकावून पाहतो. काळोख एवढेच शब्द त्याच्या मुखातून बाहेर पडतात. दाराजवळून तो मंचकाजवळ येतो, पुन्हा दीप-शिखेकडे बघत उद्गारतो.

—मागल्या बरेच दिवसात या ठिकाणी दीप जळू शकला नाही. आज ज्योती निश्चितपणे तेवताहेत.

अशोकाच्या मुखातून हे शब्द येताहेत तोच एक व्यक्ति प्रविष्ट होते. अशोकाचं लक्ष तिच्याकडे नसतं, एकएक पाऊल संथपणे टाकत ती मंचकाजवळ येते, उद्गारते,—अशोका धन्य आहे तुझी ! विस्मयाने व भीतीने अशोक—कोण ? आलेल्या व्यक्तीचा वेष काळा असतो, जणू काय मातीच्या रजांचं वस्त्र तिनं परिधान केलं आहे. त्यावर मधून मधून हिरवे ठिपके आहेत, हिरवेपणा शेतांचा, रानांचा, वृक्षांचा.

व्यक्ति—अखिल जीवनाची माता, स्थिरचराची जननी एका विजयी नरवीराची आई, तुझ्यापुढं उभी आहे. बघितलं नाहीस माझ्याकडे ? ओळखल नाहीस मला ?

तो तिच्याकडे न बघताच प्रणाम करतो.

अशोक—माते, बालकाचा प्रणाम स्वीकार, या रात्रीच्या वेळी का आलीस ?

सृष्टिमाता—माझी भाषा इतर वेळी तुम्हाला कळत नाही. म्हणून यावेळेला आले मी. आज कलिंगाधिपतीचा पराभव करून तू मौर्यसम्राटाचा सन्मान वृद्धि केलास, मी अभिनंदन करायला आले आहे.

हर्षोत्फुल्ल स्वराने अशोक—आई !

मान लवून प्रणाम करतो.

सृष्टिमाता चालू लागते. समईतील ज्योत सारते व अशोकाकडे तोंड करून प्रकाशात उभी राहते व बोलू लागते—पाहालंस माझं रूप ?

तिच्या ओठाभोवती लाल ओघळ असतात. अशोक भयभीत व विस्मित स्वरात उद्गारतो. माते !

सृष्टिमाता—सुख वाटलं तुला माझं रूप बघून ? कशी छान दिसते मी एखाद्या लावेसारखी ! बघितलेस माझे रक्ताळलेले हात ? ओठाभोवतालचे रक्ताचे ओघळ ? माझ्या वस्त्रावरील हिरव्या छटा किरमिजी झाल्या आहेत व रक्ताळून काळवंडून गेल्या आहेत.

अशोक—पुरे, पुरे, पण मला हे का सांगते आहेस ?......ह्या रूपानं तू का आलीस माझ्यापुढं ?

सृष्टिमाता—ह्या रूपानं ? नाही आवडलं तुला ? तुझ्या विजयाचा वेष परिधान करून आले आहे.

संभ्रपणे शब्दाचा उच्चार करीत अशोक—माझ्या विजयाचा वेष ?

सृष्टिमाता—होय.

अशोक—नाही, नाही, हा माझ्या विजयाचा वेष नाही. तो शुभ्र, धवल कांतीयुक्त आहे.

सृष्टिमाता—(एकेक शब्द तोडून) शुभ्र !...धवल !.......कांतियुक्त !

अशोक—होय माते. हाच रंग आहे माझ्या विजयाचा.

सृष्टिमाता—विजयाचा रंग !

अशोक—होय, माते.

सृष्टिमाता—कुणाला ? तुला.

अशोक—मला.

सृष्टिमाता—होय, केवळ तुला.

अशोक—असं का म्हणतेस माते ? तुझ्या पुत्रानं शौर्य गाजविलं, अलौकिक कृत्य केलं तर तुझाच माथा उंच नाही का होणार ? तुलाच नाही का भूषण होणार ?

सृष्टिमाता—भूषण ! एक गोष्ट तुझ्या ध्यानात नाही.

अशोक—माते, कोणती ?

सृष्टिमाता—कलिंगाधिपती माझाच होता. त्याचे सैनिक माझेच पुत्र होते.

अशोक अनिमिष नेत्रांनी तिच्याकडे बघत राहतो.

आणि त्यांची काय दशा केलीस तू ? माझी देखील. तुम्ही एकमेकांचे वैरी झाला, एकमेकांचा निःपात करायला उद्युक्त झाला. तुम्हाला त्याचं काहीच नाही. दुःख मला, एकटीला, मी तुम्हा दोघांचीहि आई ना ? म्हणून.

अशोक—माते !

उजवा बाहू डोळ्यावर घेऊन डाव्या हाताने "पुरे पुरे" असा अभिनय.

सृष्टिमाता—थांब, लक्ष दे, नीरव रात्र कोणते शब्द ऐकवते आहे, ऐक.

कोलाहल, "अरे कुणी पाणी पाजारे !"—विव्हळण्याचा आवाज.—अंगावरचं नेतोस ? ने. मी इथं कोल्ह्याकुत्र्यासारखा—ए ए—ए-ए—नरडं—दावल्याचा आवाज—कुत्र्याचं भुंकणं—अरे बापरे ! [गिधाडानं हृदयाचा—ए सति-सावित्री ! आणखी ऐकायचंय ? तुझा आनंद—सगळं दुःख मला... आई आहे ना मी सगळ्यांची !

अनुक्रमणिका

अशोक —करुण स्वरात, हताश भावानं. नको, नको बोलूस काही . . काही बोलू नको. पुरे . [हुंदका]

सृष्टिमाता—मी कोण पुरे करणार ? ती रात्र ओरडून राहिली आहे. माझ्याप्रमाणेच तिचीही बोलण्याची वेळ हीच. दिवसाच्या वेळी आपल्याच खऱ्याखोट्या कर्तृत्वाच्या दिमाखात तुम्ही मग्न असता.

(अशोक कानावर हात ठेऊन खाली बघत उभा राहतो.)

काढ ते हात. मी काय विचारते ते सांग.

कलिंगाचा घात तू का केलास ?

अशोक—का ? राज्य मिळावं म्हणून.

सृष्टिमाता—राज्य मिळावं असं का वाटलं ?

अशोक—सम्राटपदाचा मान लाभावा म्हणून.

सृष्टिमाता—सम्राटपद म्हणजे काय रे ?

अशोक—का विचारतेस तू हे ?

सृष्टिमाता—जे तुला हवं आहे, ते काय आहे, हे तुला माहीत आहे की नाही, हे समजून घ्यायला !

अशोक—माझे पितामह सम्राट होते. सगळी भारतभू त्याच्यापुढे नम्र झाली होती. एकटा कलिंग मात्र दिमाखानं मिरवत होता. त्याला आज मी जिंकलं व मौर्य साम्राज्याची सांगता केली.

सृष्टिमाता—प्रेतांचा डोंगर उंच केलास, आणि त्याच्या शिखरावर चढून तू उभा राहिलास, हेच ना तुझं म्हणणं ? इतक्या जिवांचा आज तू नाश केलास. कुणी तुझं काय केलं होतं ? कोणती आगळीक केली होती ? की जिवंत राहण्याचा त्यांचा एक यःकश्चित् सामान्य अधिकारहि तू हिरावून घेतलास !

अशोक—जग जिंकायचं एवढीच विजिगीषु मनाची आकांक्षा असते. परिणामांची खंत त्याला नको.

सृष्टिमाता—खंत नको, ऐक, ती रात्र ओरडते आहे.

कुलांगना ! कलिंगातील रमणींना हे संबोधन नाही. त्या गुलाम आहेत, केवळ दासी. दासींनाहि सन्मान आहे. पराजित अबलांना तोहि नाही. केवळ सम्राट अशोकाच्या सैनिकांच्या विलासाचे त्या स्थान. एवढाच त्यांचा मानसन्मान, लौकिक.

पाहिलंस. तुम्हाला, तुमच्या मुलाबाळांना जन्म देणाऱ्या मातांची विटंबना ! मातांची विटंबना म्हणजे मानववंशाचं मरण ! मानवधर्माचा नाश !

अशोक--नको बोलू, मी आत्ताच माझ्या सैनिकांना--

सृष्टिमाता—काही व्हायचं नाही. मला माझ्या मुलांचं रक्त प्यायला लावलंस. छिन्नविच्छिन्न झालेली शरीरं माझ्या अंगावर लोटून दिलीस. गतप्राण देह माझ्या हातात, कटिखांद्यावर दिले. चारचौघांसमोर नारीदेहाभोवतालचं वस्त्र फेडलेलं मला पाह्यला लावलंस. असंख्य जिवांची तगमग मला जाणवून दिलीस. [उपहासानं] हे सगळं थोर व पवित्र कार्य तुझं. सैनिकांचे हात बांधून काय होणार ? कारण तर तू आहेस ह्या सगळ्या उत्पाताला. युद्ध निर्माण व्हायला कारण तू. बाकीचं सगळं मागून आपोआप होतं. आकांक्षा दुर्दम झाली, हिंसेची भावना मोकाट सुटली की, मानवी संसाराची धूळधाण उडालीच..... कुठवर चालणार.

सृष्टिमाता बोलत असता अशोक प्रथम व्यग्रचित्त, नंतर शांत, नंतर कृत-निश्चयी दिसतो.

डोळ्यातील आसवे पुसून अशोक—आई निराश होऊ नकोस. यानंतर हे पाप माझ्याकडून कधीहि होणार नाही.

सृष्टिमाता—तुझी आकांक्षा ?

अशोक—माते, तिला जगात सुखानं राहता येत नाही. जगता येत नाही. हिंसेची भावना मानवी संसारात विष कालविते. मी ते विष काढून टाकीन. माझी तरवार यानंतर युद्ध खेळण्याच्या भावनेनं कधीहि म्यानातून बाहेर पडणार नाही. माझ्या राजदंडानं, राजवैभवाचं सामर्थ्य जगात शांतता रहावी म्हणूनच व्यक्त होईल.

सृष्टिमाता—तुझा मंगल संकल्प सुफलित होवो.

[दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हा संवाद 'भवितव्य' साप्ताहिकात आला होता. तो पुनर्मुद्रित करीत आहोत. —संपादक]

साधारणपणे बावन–त्रेपन्नचा तो काळ असेल. कॅलेन्डरवरची पाने फाटली, तशा काही टिकाऊ खुणाहि हारवल्या. रामभाऊचे हॉटेल हे एक आमचे ठिकाण त्या हारवल्यातलेच. चार ठिकाणची चार माणसे तेथे येत. नेमाने येत. बसत. चहा पीत. अशा पुन्हा पुन्हा येण्याबसण्यातल्या नियमितपणामुळेच आम्ही एकमेकांच्या लक्षात राहलो. मुद्दाम अशी कोणाशी ओळख करून घेतली नाही. नावेहि क्वचितच ठावी होती. पण चेहरे ध्यानात राहिले. इतर उपहार-गृहांच्या बाबतीत हे असे घडलेच नसते. रामभाऊचे हॉटेल ही एक विशेष संस्था होती. तेथे हॉटेल मेन्टालिने येणारा कोणीच नसे. ते भर राजकमल चौकामध्ये व ऐन मुख्य रस्त्यावर असूनहि गल्लीबोळातल्या एककल्ली वास्तूचा चेहरा राखून होते. तेथे प्रवेश केला म्हणजे आम्हाला आमच्या जगात शिरल्या-सारखे वाटे. तेथला चहा व इतर खाद्यपदार्थ यांना आमच्या आवडीच्या चवी होत्या. तिऱ्हाईत गिऱ्हाइकाला त्यातले काहीच मानवणारे नव्हते. ज्याला त्या चवी, तो अर्धवट अंधार व एक तऱ्हेची घरगुती शांतता मानवे तो आमच्या-तलाच होऊन जाई. आमच्याशी न बोलता, आपले नाव गाव न सांगता तो आमचा बने. त्या कुटुंबातच शेळके पहिल्यांदा भेटले.

उद्धव शेळके

मधुकर केचे



किडकिडीतपणात शेळक्यांवरहि ताण करणारा, थकलासा वाटणारा; पण हसतमुख असा त्यांचा एक मित्र व शेळके यांच्या तिथल्या बसण्याच्या जागा ठरलेल्या होत्या. दोघेहि सोबतच येत. छापखान्याच्या व्यवसायातले ते दोघेहि. पुढे शेळक्यांनी प्रेस बदलला. त्यामुळे त्या दोघांचे येणे आधीनंतर झाले. पण एक आला तरी दुसऱ्याची वाट पाहात बसे. तो आल्याशिवाय हा चहा घेणार नाही हे हॉटेलवाल्यालाहि माहीत झाले होते. परस्परांची ही संगत इतक्या वर्षात कधीहि पांगली नाही. त्या दोघात साम्यगुण काय होते ते देव जाणे; पण एकमेकांची वाट पाहणे, काही वेळ मूकपणे थकलेल्या चेहऱ्याने बसणे, दोन किंवा कित्येकदा एक चहा दोघा मिळून घेणे येवढे साम्य मात्र कोणाच्याहि नजरेस एकदम पडत असे. केवळ उत्सुकता म्हणून मी त्या दोघात मिसळलो. त्यानंतर मात्र त्यांच्यातली समानशीलता उलगडत गेली. टोकेकर व शेळके यांच्यात ईश्वराने एक महान गुण ठेवला होता. सभोवारच्या जगाचे निरीक्षण करण्यात ते अतिशय निष्णात होते. स्वतः ऐहिक दुःखामध्ये गुंतलेले असूनहि ते दुःखाचे निरीक्षण करू शकत होते. त्यात त्रयस्थाची भूमिका ठेवू शकत होते. टोकेकरांनी आपला देह व मन पिचवणारा मुद्रकाचा व्यवसाय सांभाळूनहि विवेकानंद, गांधी इ. चे ग्रंथ पठण केले होते. त्यांच्या जगात दुर्मिळ असणारी तत्त्वज्ञानाची बैठक तेथे होती. शिवाय नेहमीचे जग ओलांडून पुढे जाण्याची तीव्र लालसा दोघांनाहि होती. आमची ओळख वाढत गेली तसे मग मलाहि त्या दोघांमध्ये आपण मिसळून गेल्यासारखे वाटले, पण ते नुसते वाटणेच होते. शेळक्यांच्या जीवनात टोकेकराइतके कोणीच विरघळले नसेल. मी पाहात होतो त्याच्या किती तरी आधीपासून ते सोबत होते. कधीमधी त्यांचे बोलणे ऐकले म्हणजे कळे की ते दोघेहि नशीब काढण्यासाठी मुंबईस जाऊन आले होते. दोघांनीहि सारखीच सुखे व दुःखे पाहिली होती.

शेळके लेखक आहेत हा संशय त्याच चहा-बैठकीमध्ये आला. टोकेकरांशी ते बोलताना शंका येई की त्यांची वर्णने ही जीवनातल्या काही प्रातिनिधिक घटनांची दर्शने आहेत. एकदा असेच शेळके आपल्या मित्राला सांगत होते, "···त्याला तर घर सोडायचे नव्हते. पण त्याचा उगीचच भार तर यजमानांना नको होता. हो, ना करता करता शेवटी त्याला घालवण्याची तयारी झाली. स्टेशनावर जायला त्याचा पाय निघेना. यांना तर त्याला हाकलण्याची घाई झालेली. गाडी तशी चार तासांनी; पण त्यानं आताच निघावं म्हणून त्याला सांगतात काय तर—'अरे या रेलवेचा काही नेमच राहला नाही. कधी कधी तर गाड्या पाच पाच तास आधी जातात.' आणि हे ऐकून त्याला हो म्हणणेहि परवडेना किंवा नाही म्हणणेहि जमेना." कुठल्यातरी सत्य घटनेचे का होईना पण हे वर्णन एका वेगळ्या निरीक्षणातले होते. त्यातूनच कळले की शेळक्यांच्या कुठल्याशा कथेतला तो भाग होता.

अनुक्रमणिका

आपले नोकरीपाण्याचे जग विसरताना किंवा ते विसरावे म्हणून दोघे मित्र आपसात विनोद करीत. त्यालाहि एक दर्जा असे. त्या हॉटेलमधल्या कुठल्याहि गोष्टीला दर्जा असण्याचे कारण नव्हते. पलंगतोड, आलूबोंडा, लैला मजनू चटणी असे काही तरी बोलले म्हणजे विनोद होतो असे मानणारे ते वातावरण. त्यात या मित्रजोडीचे विनोद तेथे न शोभणारे वाटत. विशेषतः एखाद्या कुठल्या तरी व्यक्तीचे केवळ एकदोन वाक्यात वर्णन करायचे असल्यास त्या विनोदाची कसोटी लागे. दीड दोन वाक्यात संपूर्ण माणूस उभा केला जाई, "हा, हा तो ना ! त्याला मणभर इंधन आणायचे असले तरी तो कोऱ्या फियॅटमध्ये एकेक झिलपी ठेवून दहा येरझारा करील."

परवा पुण्यातल्या एका लेखकाने शेळक्यांची 'धग' वाचली. मंगेश पदकी सांगत होते, "त्या गृहस्थास ती धग इतकी आवडण्याचे कारण म्हणजे शेळके हा एवढा मोठा कॅनव्हास रंगवताना कोठेहि कॉन्शस नाहीत." ते अगदी खरे आहे. त्रेपन्न चौपन्नचे साहित्यिक जग सत्यकथा मासिकाचे हरीनामासारखा जप करीत होते. आणि शेळक्यांनी एका उत्तम कथेची गोष्ट सांगितल्यानंतर ती कुठे छापून आली हे विचारले तर उत्तर काय ? "मी ती यशवंतमध्ये दिली"

"का ?"

"मी नेहमीच यशवंतमध्ये देतो. का ? त्यात काय झाले ?"

"झाले काहीच नाही. यशवंत वाईट नाही. चांगले जुने मासिक आहे; पण तुम्ही सत्यकथेत का देत नाही !"

"ते चांगले आहे का ?"

आत्ता देवा ! या माणसाला काहीच कसा पत्ता नव्हता ! "अहो, त्यात निदान एकदा आपण यावे याची किती लोक स्वप्ने पाहतात. आणि तुम्ही ! आता एखादी कथा तिकडे पाठवा."

"मी त्या मासिकाचे एक दोन अंक वाचतो. मग पाठवीन."

'मग पाठवीन' हे शेळक्यांनी (त्यांचाच वाक्प्रयोग उचलायचा तर) सुपारी खाण्याच्या सहजतेने म्हटले. सत्यकथेसाठी झुरणारी व हाती न लागलेल्या प्रेयसीस द्याव्या तशा त्या मासिकास शिव्या देणारी मी किंवा मत्सम मंडळी मनातच हासली. 'पाठवीन' काय ! उकीरड्यावर बसलेल्या माणसाने म्हणावे, "सोन्याचे घडचाळ म्हणता होय; उद्या घेऊन टाकू."

आम्ही प्रसंग विसरलो. एक दिवस शेळक्यांनी सांगितले, "एक कथा सत्यकथेकडे धाडली." अरे बावा, कशाला येवढ्या मोठ्याने सांगितले हे ! या माणसाला प्रसिद्धीच्या क्षेत्रातले साधे नियमहि माहीत नव्हते. एखाद्या

मासिकाकडे कथा पाठवल्यानंतर पाचीची वाट पाहात बसायचे. कोणी विचारलेच तर 'येवढ्यात काही लिहूनच झाले नाही; मूड लागत नाही, संपादक आग्रह करतात; पण इलाज चालत नाही' इ. इ. ठोकायचे. पोच आल्यावर मागणी आल्याची वार्ता हुंदडायची व 'तिकडच्या स्वीकृती'चा सुवर्णयोग आलाच तर 'येवढ्यात एक कथा लिहीन म्हणतो' असे सांगायचे. नंतर कोण्या महिन्यात ती देणार हे संपादकाने कळवले तर ती छापून येण्याच्या पंधरा दिवस आधी सांगायचे, "त्यांनी छपाई अडवली आहे. माझी कथा गेल्याशिवाय ती सुरूच होणार नाही" असे सांगून मग पंधरा दिवसांनी अंक मिरवायचा. पण शेळक्यांना या युक्त्या माहीत नव्हत्या. सत्यकथेकडे कथा पाठवल्याची बातमी देणे हा आपली फोतरी करून घेण्याचा नामी रस्ता होता. शेळके त्याच रस्त्याने चालत होते.

आणि एक दिवस सत्यकथेत ती कथा ('माय') आली. येथे आम्ही चाट पडलो. 'यशवंत' मध्ये कथा आल्याच्या आनंदापेक्षा शेळक्यांच्या चेहऱ्यावर खरोखरीच काहीही जादा नव्हते. पुढे पुढे मासिकांच्या उच्चभ्रूतेचा, तुलनांचा त्यांनाहि परिचय झाला. ते नेमाने सत्यकथेत लिहू लागले. त्याच वेळी इतरत्रही ते लिहीत होतेच. 'नांदतं घर' ही एक कादंबरी त्यांनी कथासागरमध्ये लिहिली. त्यांच्या खऱ्या आवडीनिवडीचा त्यावेळी त्यांचा त्यानांच परिचय झाला. ते मासिक अनायासेच पुस्तकाच्या आकाराचे होते. त्यामुळे त्यांची कादंबरी मासिकात येऊनही पुस्तकाचा तोंडावळा मिरवू लागली. आपल्या लेखनाने पुस्तकरूप घ्यावे असे त्यांना वाटू लागले. त्यांनी त्या मासिकाच्या पानांचे बाइंडिंग करून पुस्तक बांधले. आणि एक दिवस तर आपल्या काही आवडीच्या कथांचा मजकूर स्वतःच टाईप जुळवून छापून काढला. त्याला नावही मोठे झक्क दिले 'शिळान'. अशी ही दोन पुस्तके त्यांच्या जवळ झाली. एक ते मासिक अर्धे पुस्तक व हे 'शिळान'. टोकेकर झाले प्रकाशक. मग एकदा आम्ही त्यांना म्हटले, "शेळके, तुम्ही पुन्हा एक कादंबरी लिहून मुंबईच्या प्रकाशकाकडे का नाही पाठवीत?"

"काय करू हो? मी एक कादंबरी लिहिली आहे; पण कथा कमी पडल्या म्हणून त्यातलीच काही प्रकरणे काढली व दिली पाठवून मासिकांना..."

"अहो, हे काय बोलताहात? कथा म्हणजे काय कादंबरीचे प्रकरण असते?"

"ते तुमचे तुम्ही पाहा."

मग त्या कथा अर्थ कादंबरीची प्रकरणे मी मुद्दाम पाहिली. ती कथा म्हणजे **'पावसाळा'**. शेळक्यांनी सांगितले नसते तर संशयही आला नसता इतक्या त्या

स्वतंत्र 'कथा' होत्या. वाङ्मयीन तंत्राचा हा मला नवीनच साक्षात्कार होता. शेळक्यांनी अजाणतेपणी तो चमत्कार करून दाखवला होता. तंत्र, प्रसिद्धी इ. बद्दल हा माणूस कॉन्शस नाही याबद्दल त्याचा खूप हेवा वाटला.

आपले रोजच्या नोकरीचे जग सोडून शेळके एका अफाट विश्वात शिरत होते. आरंभी शेळक्यांच्या न कळत हे घडले. पुण्यामुंबईच्या त्या अक्षर विश्वात खूप ओढले गेल्यानंतर मात्र ते एकदम दचकले. लेखक शेळकेपेक्षा माणूस शेळकेची खूप धावपळ होऊ लागली. त्यांनी कल्पनाहि केली नसेल येवढी विलक्षण प्रतिभा त्यांच्यात आपला विलास दाखवू लागली व शेळके दचकू लागले. पँट, बुशशर्ट वगैरे नवाच अवतार त्यांचा झाला. सुशिक्षितांच्या जगात वावरताना ते काही गोष्टींची दखल घेऊ लागले. पण पोशाख बदलल्याने काही माणसाचा स्वभाव बदलत नाही. शेळक्यांनी निरीक्षणासाठी म्हणून खूप जग पाहिले; स्वतः जगण्याचे जग मात्र मर्यादित होते. खेड्यातले, खेडेवजा मोहोल्ल्यातले कडूगोड गुणधर्म त्यांच्यात कायमचे बसले. एक प्रकारचा रासवटपणा त्यांना नेहमीसाठी चिकटला. उच्चार, भाषण, चमकदार वागणे इ. स्पर्शही नसलेल्या व आर्थिक अडचणी, त्यात निर्माण झालेली माणसे यात त्यांच्या आयुष्याचा कितीतरी काळ गेला. आणि हे सर्व झटकून एकदम 'त्रिमिती', 'तिर्यक दृष्टिकोन', इ. इ. च्या जगात शिरताना ते निश्चितच भांबावले. एक दिवस त्यांनी सायकलला सोडचिठ्ठी देऊन मोटारसायकल आणली. माणूस जिद्दी खराच. कुठला तरी एक 'नेफा' सारख्या प्रदेशातला प्लॉट विकत घेतला. मलाही एक घ्यायला लावला. कथेचे प्लॉट जमले तरी घराचे प्लॉट आपल्याला कळत नाहीत हे उमगल्याने मग आटापिटा करून तो विकूनहि टाकला. मग काही दिवसांनी थोडे शहाणे होऊन पुन्हा एक प्लॉट घेतला. आणि त्यावर चक्क इमारतहि बांधून टाकली. हे सर्व चालू असताना आणि सुशिक्षित, सुसंस्कृत व श्रीमंत राहणीत रमण्याचा प्रयत्न करीत असताना ते मला म्हणाले, "मला तुम्ही इंग्रजी शिकवा."

"शेळके, हे कसले एकेक खूळ घेऊन बसता? मी झक मारली अन् इंग्रजी शिकलो. परिणाम म्हणून तीनचारशा रुपडल्यावर सारे जीवन बरबाद केले. मुंबई विद्यापीठातले उद्याचे सर्व कारकून व प्रोफेसर तुमची कादंबरी शिकत आहेत. इंग्रजीचे जाणकार तुमची वग पथेर पांचालीशी तुळावी की आणखी कोण्या आंग्ल कृतीशी तोलावी याचा गंभीर विचार करीत आहेत. अशा वेळी त्या इंग्रजीचा गंध आपल्याला लागला नाही याचा गौरव मानण्याचे सोडून हे…"

"हे बघा तुम्हाला वेळ नसेल तर दुसऱ्याचे नाव सुचवा. किंवा घरच्या घरी अभ्यास कसा करता येईल ते सांगा."

यावर काय सांगायचे? हा माणूस राहणार त्या तपोवनात. म्हणजे अमरावतीपासून काही मैलांवर. त्याला इंग्रजी शिकवायला मास्तरांनी जावे कसे?

अनेक दिवस मला वाटले की शेळक्यांनी हा नाद सोडला असेल. पण एक दिवस दिवाळसणासाठी त्यांच्या तपोवनातल्या घरी गेलो तर रेडियो इंग्रजीतून वाजत होता. टेबलावर Times पडला होता आणि कपाटात टागोर, टॉलस्टाय, हार्डी इ. मंडळी बसली होती. त्यांच्या शेजारीच एक 'इंग्लिश इन्टू मराठी' कोश अदबीने बसला होता. रीडर, प्रायमर इ. पायऱ्या चढण्यापेक्षा शेळक्यांनी अशी सुरुवात केली होती व दोन महिन्यातच ते टाइम्स वाचू लागले होते. कादंबऱ्यांत इंग्रजी संवादहि घालू लागले होते.

शेळक्यांचे वाचन म्हणजे एकेकाळी तरी गंमतच होती. प्रूफ रीडरसारखे एकेक अक्षर जपून वाचल्याने येणारी अडखळ व चमत्कारिकपणा त्या वाचनाला होता. त्यांना त्याची जाणीव झाली व रेडियोवर कथा वाचतांना ते सामान्य माणसासारखे वाचू लागले. पुढे पुढे तर जळगावची नि कुठली कुठली भाषणांची निमंत्रणेहि स्वीकारू लागले.

"शेळके तुम्ही कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या प्रकरणाच्या कथाहि करू शकला. आता नाटकाकडे वळा ना." मग एका स्पर्धेत त्यांनी नाटक पाठवून बक्षीस मिळवले. निदान कविता तरी करणार नाहीत असे वाटले होते. पण दर्यापूरच्या कविसंमेलनाचे अध्यक्ष व्हा असे निमंत्रण आले तेव्हा त्यांनी तेथे एक कविताहि म्हटली म्हणतात!

रामभाऊचे हॉटेल गेले. राजकमल चौक बदलला. शेळकेहि बदलले. मुद्रकाची नोकरी, बक्षिसे, मोबदले, आधुनिक पोशाख, इंग्रजी भाषा हे आले. आणि हे सर्व दत्तक जाऊन, घरजावई होऊन, जातीचा फायदा घेऊन किंवा सरकारी सवलती घेऊन नव्हे— स्वतःच्या कर्तबगारीने. तपश्चर्येने. या काळातले हे दुर्मिळ उदाहरण. हे सारे बदल झाले. पण मूळ शेळके अभिन्न. टोकेकरांची व त्यांची मैत्री तीच. केवळ त्यांना भेटण्यासाठी ते इतक्या दुरून शहरात येतात. मैत्री अभिन्न तसा स्वाभिमानहि जशाचा तसाच. एक दिवस पुण्याचे एक प्रकाशक आले. लेखकासमोर आपली गरज दिसू द्यायची नाही ही त्यांना अजब सवय. "शेळके एखादी चांगली कादंबरी लिहली तर आम्हाला द्या."

"मी नेहमीच चांगल्या कादंबऱ्या लिहितो."

"म–म–मग आता आहे का एखादी?"

"ज्यांना ती चांगली वाटली त्यांना देऊन टाकली आहे." आणि दोन मिनिटांनी आतिथ्यशील शेळक्यांनी त्या नकाराचा कडवटपणा घालवणारा चहा फराळ देऊन प्रकाशकांना निरोप दिला. असेच एकदा मुंबईकराबाबत. 'घग' लिहिली. संपादक म्हणाले, 'रिराइट करा,' केली. पुन्हा संपादक म्हणाले,

'रिराइट करा.' केली असती हो; पण कंटाळा आला. आता रिराइटला अंतच उरला नसता."

आताशा शेळक्यांच्या भेटी होत नाहीत. कादंबरी लिहायची तर स्वतःला महिनोंशी कोंडून घेण्याची त्यांची जुनीच पद्धत. आजकाल तर चेहराहि दिसत नाही. अशा वेळी जुन्या आठवणी चाखतो—संध्याकाळी शेळके राजकमलवर भेटतात. टोकेकरांसोबत माझाहि चहा होतो. सिगरेटींची देवाणघेवाण होते. एकदीड वाक्यात एखादे व्यक्तिचित्र उभे होते, "आता काय म्हणावे त्या तमक्याला! त्याने चक्क दिवाळी अंकाला अनाहूत कथा पाठवली. अहो, जो दुकानदार येऱ्हवी उधार देत नाही त्याला काय नेमके भवानीच्या वेळी उधार मागायचे!"

मग टोकेकरांना निरोप. "तुम्हाला गाडगे नगरातच जायचे ना? मग कॅम्परोडनेहि जाता येईल. पण असं करा—सायकली हाती घेऊन जाऊ. उगीच चढावरून पॅडल मारायला नको. पायीच बरे."

तेव्हा ओळखायचे की गृहस्थाला काही तरी बोलायचे आहे. मग नव्या कादंबरीचे कथानक सुरू होते. माणसे उभी केली जातात. वातावरणाच्या खाचाखोचा आणि घटनांची जुळणी.....चढ संपतो. गाडगे नगराचा शेवटचा रस्ता दूर जातो. डब्यातल्या सिगरेटी संपतात. पुन्हा पिशवीतून दुसरी पाकिटे निघतात.

लिहिताना समाधी लागते की नाही कोणास ठाऊक. शेळक्यांना चालताना लागलेली समाधी मी पाहली आहे. 'स्थिरावला समाधीत' तो 'फिरे कसा, बोले कसा!' विचारण्याचे कारण नाही. समाधीतलाच माणूस फिरू व बोलू शकतो. उत्तम पोशाख, श्रीमंती इ. मी शेळक्यात पाहिले; पण त्यांचा गर्व नाही पाहिला. गर्व फक्त लेखनाचा पाहिला. विलक्षण आपुलकी त्या विश्वाबद्दल त्यांना आहे. अनेकदा गैरसमज होतो की हा माणूस इतरांना आपल्या लेखकपणापुढे क्षुद्र समजतो. पण तसे नसेल—असेलहि कदाचित. तो त्यात रमतो, रंगतो आणि रुततो हे मात्र खरे आहे. लेखणीच्या भरोशानेच त्यांनी आजचे स्थैर्य मिळवले आहे. अशा वेळी वाटते शेळक्यांचेच खरे आहे. 'अगतिका' मधली विशाल दुःखे पाहू शकणारे शेळके, 'बाईविना बुवा'मध्ये निर्भीडपणे विकृती रंगवणारे शेळके, 'धग' मधले चटके लिहिणारे शेळके त्या कॅम्परोडने मला दिसतात. मग काही वेळाने एक सडपातळ माणूस आपल्या जुन्या सायकलचे पायडल दाबीत पोहरा रोडचा चढाव चढत चढत तपोवनाकडे जाताना दिसतो. हळूहळू तो अदृश्य होतो.

श्रीमंगेशाचा रथोत्सव

अ. गो. देशपांडे

महाराष्ट्राचे नंदनवन म्हणून ज्याचे यथार्थ वर्णन केल्या जाते त्या गोमंतक प्रदेशाचे दर्शन घ्यावे ही उत्कंठा होतीच. पण कालिदासाने वर्णन केल्याप्रमाणे 'प्ररूढशालिचयमनोहर' शिशिरात तेथे जाण्याची सुसंधि प्राप्त व्हावी हे अहो-भाग्यच म्हटले पाहिजे ! वस्तुतः, प्रेमिकांचे अपराध भामिनींना लीलया विसरायला लावणाऱ्या शिशिर ऋतूचा महिमा वसंतापेक्षा मोठाच मानायला हवा ! नाही तरी वसंताचा तो अग्रदूतच होय ! पण हेमंताचे वैभव पाहण्यासाठी ज्याप्रमाणे हिमकालात सिमल्यासारख्या हिमालयीन शहरातच जायला हवे, त्याचप्रमाणे, मला वाटते, शिशिराचे सौंदर्य पाहण्यासाठी गोव्यातच राहायला हवे.

कारण गोवा ही विधात्याने आपले सर्व कवित्व, सर्व रसिकत्व पणाला लावून निर्मिलेली भूमि होय. एरव्ही पदोपदी दूषणार्ह ठरणारा चतुरानन हा अनन्यचतुर कवीही आहे, याचा प्रत्यय येथे एकसारखा येत राहतो. कवींनी वर्णिलेले हिरवे गालिचे ह्या सृष्टिकवितेच्या कवीने येथे प्रत्यक्ष पसरले आहेत. शालिहरित गालिच्यामध्ये नारिकेलांची नक्षी काढून मांडवी-अधाशींचे चंदेरी पट्टे ओढून त्या आदि चित्रकाराने आपले लाडके चित्र पूर्ण करण्यासाठी सभोवती गोमंत पर्वताची महिरप काढलेली आहे.

ह्या सुंदर भूमीचे कुलदैवत मंगेश ! मंगेश या नावातच एक जादू आहे. त्यात इतिहास आहे, काव्य आहे, संगीत आहे ! द्यूतात प्रियतमेकडून हार झाल्यानंतर (किती गोड हार !) गिरीशाने कैलास सोडून दक्षिणेत गोमंतकात कुशस्थळीत (आजचे Cortalim किंवा कुठ्ठाळी) येऊन तपश्चर्या सुरू केली. हा अबोला घालविण्यासाठी अबोलीच्या फुलांची वेणी घालून पार्वती आली हे तपश्चर्येतही शंकराने ओळखले व मायेने एक वाघ निर्माण केला ! आधीच शिशिराची थंडी व त्यात वाघाची भीती ! त्या जगज्जननीच्या तोंडून शब्द फुटे-नात. 'त्राहि मां गिरीश' असे म्हणताना काही अक्षरे उमटलीच नाहीत. . . .
'मां–गि–ई ऽ–श ! '

झाले ! तेव्हापासून शंकराचे येथले आवडते नाव (मांगिरीश) मांगीश म्हणजेच मंगेश असे आहे. बहुतेक गोवेकरांचे मंगेश किंवा शांतादुर्गा रूपाने येथे

राहिलेली पार्वती, यांपैकी एक कुलदैवत आहे. अर्थात् दोन्हीही संप्रदायाच्या लोकांना मंगेशाचे महत्त्व असणारच ! मंगेशाने येथे लोमश या तपस्व्याला माघ शुद्ध पौर्णिमेला चंद्रग्रहण असताना दर्शन दिले व लोमशाच्या अनुरोधाने येथेच आपले वास्तव्य ठेवण्याचे वरदान दिले, तेव्हापासून माघ पौर्णिमेला येथे जत्रा भरते. मंगेशाची त्या दिवशी रथयात्रा होते. जवळ जवळ संपूर्ण गोवा बेट त्या दिवशी येथे लोटते. परप्रांती परदेशी असलेले गोवेकरही येथे येण्याचा प्रयत्न करतात किंवा निदान येथून प्रसाद मागवितात. अशा वेळी आम्ही येथे अनायासे आलो आहो हे अहोभाग्यच नव्हे काय ?

आज मंगेशाचे मंदिर पूर्वीच्या कुशस्थळी नसून पणजीपासून १४–१५ मैलां-वर बस्च्या रस्त्यावर प्रियोळला आहे. (अर्थात् प्रियोळपेक्षा मंगेश किंवा मंगेशी हेच नाव जास्त प्रसिद्ध आहे !) आदिलशाहीत झालेल्या धार्मिक छळामुळे त्रास-लेल्या हिंदूंनी आल्बुकर्कला मुसलमानांविरुद्ध साहाय्य केले, हा इतिहास विसरलेल्या पोर्तुगीजांनी जेव्हा स्वतःच हिंदूंचा धार्मिक छळ करण्यास सुरुवात केली तेव्हा मंगेशाचे देवालय हिंदूंनी येथे आणून भव्यतर प्रमाणावर पूजा–उत्सव सुरू केले.

श्रीमंगेशाचे देवालय भव्य आहे, समोरील दीपस्तंभ उत्तुंग आहे, आसमंतात सुंदर सौध आहे, समोर विस्तीर्ण प्रांगण आहे. बस–रस्त्यावरच महाद्वार आहे. आतून जाताना दोन्ही बाजूंनी दिसणारी धानाची हिरवळ मन मोहरून टाकते. मधून मधून उंच नारळाची झाडे श्रीमंगेशाला लवून नमताना दिसतात. देवस्थान अतिशय श्रीमंत आहे. संध्याकाळी जत्रेला येणारे हजारो लोक प्रसाद म्हणून भोजन करून जातात. समोर नौबतखान्यात चौघडा ठेवलेला असतो. तो फक्त सकाळी देवाला उठविण्यासाठी व आरतीच्या वेळी उपयोगात आणावयाचा. इतर वेळी तुम्ही त्यास नुसता स्पर्श केला तरी तेथील वाजंत्रीवाला तुम्हाला न समजणाऱ्या, त्याच्याच, बहुशः हावभावमय भाषेत, तुमच्यावर रागावेल ! आत विशाल सभागृह आहे. शेकडो स्त्रीपुरुष बसू शकतील असे हे सभागृह आजच्या दिवशी श्रीमंगेशाचे दर्शनसुद्धा घेणे अतिशय कठीण होईल इतके गजबजून भरलेले असते. दोन्ही बाजूंना सुंदर गोल खांबांवर शंकर–पार्वतीची रंगीत चित्रे काढली आहेत. गर्भागारात श्रीमंगेशाची पिंड आहे व सुंदर उत्सवमूर्ती आहे. येथे ५२ नंदादीप अहोरात्र तेवत असतात. भोवताली श्रीशंकराचा गोमंतकातील गण–काळभैरव ग्रामपुरुष, शिवशर्मा, लोमश इत्यादि – यांची मंदिरे आहेत.

शिशिर ऋतूतली पौर्णिमा ! टिपूर चांदणे पडलेले आहे ! थंडीत गोडवा आहे ! संपूर्ण गोव्याचे सौंदर्य वैभव लेवून कुलदैवताच्या दर्शनाला आलेले आहे ! आज मंगेशाचा वार्षिक (की शैशिर !) उत्सव आहे ! रथयात्रा आहे ! आज निद्रेला पापणीच्या दारावरच बंदी घातली गेली आहे !

छोटी मोठी दुकाने भोवती लागली आहेत. पण फुलांची आणि श्रीफलांची सर्वात जास्त गजबजलेली! हा भाविकांचा मेळा अवर्णनीयच! काही येतात, फूलफळ विकत घेतात, देवाला निवेदितात, प्रसादाचे फूल घेऊन जातात. काही रात्रभर राहणार—केव्हा देवाचे दर्शन, केव्हा देवालयात चाललेल्या भावमधुर संगीताचे श्रवण, केव्हा बाहेरील भाविकांचे दर्शन—अशा अनेकानेक गोष्टीत रममाण होत! तारामंडळातून भ्रमण करणाऱ्या ग्रहाला तेच ते तारकापुंज पुनः पुनः ठराविक कालांतराने, स्थलांतराने दिसावेत त्याप्रमाणे तेच तेच चेहऱ्यांचे मेळावे मधूनमधून दिसतात!

जवळ जवळ संपूर्ण रात्रभर संगीत-संकीर्तन चालू आहे. एकजण कथा-कीर्तन करताना कानडी, मराठी, कोकणी व इंग्लिश ह्या सर्वच भाषा-उपभाषांचा मधून मधून वापर करतो आहे. त्यात कथा आहे, काव्य आहे, संगीत आहे, वक्तृत्व आहे आणि वेदान्तहि आहे.

रात्र संपत आली! ब्राह्म मुहूर्तावर देवाला उठविण्यासाठी चौघडा झडला! रथ—मोठा रथ –सुशोभित, सज्ज झाला आहे! सोवळ्यात उत्सवमूर्ति पालखीतून आली. रथावर चढताना मंगल वाद्ये वाजली. सातमजली दीपमाळांतून दिव्यांनी मूर्तीवर आपलाहि प्रकाश टाकला. भोवतालच्या अग्रशाळांतील गच्च्यांवरून सुवासिनींचे डोळे तेजाळले. खाली विस्तीर्ण पटांगणात माणसांचा समुद्र उचंबळला. वरून चंद्राने सुधावृष्टि केली. आणि—

आणि हा कसला आवाज? एक, दोन, तीन, चार. . .अगणित! मंगेशाच्या रथावर भक्तिभाव आपले कठिण कवच फोडीत आहे. शेकडो हजारो श्रीफले आपली हृदये उघडी करताहेत. त्यात आपलेहि—शेकडो मैल दूर राहणाऱ्या आपलेहि—एक श्रीफल आहे ही जाणीव 'धन्य धन्य' करते.

रथयात्रा सुरू झाली. मंदिराच्या पटांगणात ईशान्य कोपऱ्यापासून निघून मंदिराला प्रदक्षिणा करीत पुनः तेथेच तो रथ सर्व भाविकांनी ओढून आणायचा आहे. दोन बाजूंना दोन लांबच लांब दोर आहेत. दोन्ही बाजूला शेकडो लोक हातात ते धरून श्रीमंगेशाचा रथ ओढताहेत. येथे भेदभाव नाही. उंच नीच, गरीब, श्रीमंत, वृद्ध तरुण इत्यादी सर्व भेद येथे लुप्त झाले आहेत. अद्यावत् पोषाखाचे, सूट-पँटमध्ये राहणारे एरव्ही फक्त इंग्लिश किंवा पोर्तुगीज बोलणारे कित्येक गोवेकर आज येथे रथ स्वेच्छेने, हर्षाने, धन्यतेच्या उन्मादाने ओढताहेत. आपलेहि दोन हात या सोहळ्यांत भाग घेताहेत ही एकच जाणीव आहे.

कोपऱ्यावर रथ थांबला. प्रत्येक कोपऱ्यावर थांबतो. लोकांनी घाई करू नये, कोपऱ्यावर वळवताना रथ हलू नये, वगैरे विचारांपोटी थांबला? शक्य आहे.

अनुक्रमणिका

पण येथेहि पुन: फुले वाहिली जातात. नारळं फोडतात. शिवाय देवासमोर नृत्यांगना गायन करतात–करीत असत. आजकाल नृत्य करीत नाहीत. नृत्याचा अभिनय (!) करतात. पण गायन करतात. चार देवदासी देवाच्या रथासमोर उभ्या आहेत. त्यातली एक प्रथम भूप रागात आळवते, तर दुसरी जैजैवंतीत बाकीच्या पायाने ताल धरतात किंवा सर्वजणी रासाचा अभिनय करतात. तीन वयस्क आहेत. एक तुलनेने लहान आहे. पण, मला वाटते, तिच्या मनात संकोच आहे. आपल्याकडे लोक कोणत्या जाणिवेने बघतात याचे तिला वैषम्य वाटत असावे. देवदासीची प्रथा आज बंद झाली आहे. पण या निमित्ताने केवळ एवढ्याच नामगानाच्या हेतूने प्रेरित झालेला — हा अवशेष राहिलेला दिसतो. कोल्हापूरच्या अंबाबाईची पालखी जेव्हा निघते तेव्हा कोपऱ्याकोपऱ्यावर तिच्यासमोर असेच गायन होते. त्यात शास्त्राचा काटेकोरपणा नसला तरी संकोचहि नव्हता. एक कवयित्री तर जणू उत्स्फूर्त कवन करून भक्तीच्या उन्मादात गात होती. येथे उलट आहे. संगीताला जास्त महत्व दिले जाते, पण त्यात देवदासी प्रथेच्या इतिहासामुळे संकोच निर्माण झाला असावा असे वाटते.

मी फक्त श्रीफल अर्पण केले होते. फुले मात्र वाहिली नव्हती. एका ठिकाणी रथ थांबल्यावर मनात तीव्र इच्छा निर्माण झाली. पण चिल्लर नव्हती. एवढ्या उदात्त सोहळ्याच्या प्रसंगीहि दहा रुपयांच्या व्यावहारिक मूल्याची जाणीव गळून पडत नाही, या वस्तुस्थितीने एक मन दुखविले गेले. पण अभावितपणे मंगेशाने सेवा करून घेतली. मी रथाजवळ उभा होतो. एक फूल विकणारी मुलगी आपल्या दुकानावर रथापासून फारच दूर होती. तिच्याहि मनात उत्कट इच्छा निर्माण झाली असली पाहिजे. पण एवढ्या गर्दीतून आपले चिमुकले हात कोठपर्यंत पोचणार या अडचणीत तिने मला ओंजळभर फुले दिली. मीहि आनंदलो.

रथयात्रा संपून पालखीतून देवाची उत्सवमूर्ति देवालयात नेण्यात आली. मुख्य आरती सुरू झाली. मंगलवाद्ये वाजू लागली. सूर्योदय होऊ लागला होता. आरती संपून सर्वांना प्रसाद वाटण्यात आला होता. स्वप्नमनोहर रथोत्सव संपत आला होता. कल्पनेतहि शक्य नव्हता तो या रथोत्सवाच्या सोहळ्याचा प्रसाद आपल्याला मिळाला, या आनंदाने मी भारावलो होतो.

———

अजून चालतोंचि वाट !

—उद्धव ज. शेळके

"अजून चालतोचि वाट !" हे उद्‌गारच मला भयावह वाटतात. दोन कारणांनी. एक, कुंथतपायत चालणाऱ्या अगतिक म्हाताऱ्यानं काढावीत तसे ते आहेत. या मागं म्हातारपणाचं भय येतं. म्हणून मरणाचंही. दुसरं चालत असलेली वाट "अज्जून" म्हणण्याइतकी मागं टाकली नाही. नुकतीच चालायला घेतली आहे. तसंच मागं पाहून किती चाललोय् ते सांगण्यासारखंही काही नाही. हे कदाचित् भवितव्याच्या उमेदीनं वाटत असावं. पण वाटतं खरं. उमेद का ठेवू नये ? तिला काय लागतं ?

लेखन छापून यायला लागल्याला आता अकरा वर्षं होतात. (सुरू करायला किती होतात ते मात्र नका विचारू !) इतरांपेक्षा काही 'और' होण्याच्या उमेदीनं हे करवलं. साहित्यिकांपेक्षा नव्हे, त्या वेळच्या सोबत्यांपेक्षा. साहित्यिक व्हावं असाहि माझा हक्क नि हट्ट नव्हता. सर्कशीत काम करणाऱ्या एखाद्या जनावरापासून जगातल्या थोरात थोर माणसापर्यंत कुणीही होता आलं असतं तरी मला चाललं असतं. पण यांपैकी कुणीहि होणं साहित्यिक होण्याइतकं सोपं नाही, हे मला अनुभवानं कळलं. कारण इतर काहीहि शिकायला पैसा लागतो. साधनांसाठी तरी. शिवाय शिकविणारा हवा असतो. वेळ पण लागतो. यांपैकी माझ्यापाशी काहीहि नव्हतं. केवळ पोटापायी सकाळच्या नवापासून वेळप्रसंगी रात्रीच्या चारापर्यंत राबावं लागत होतं. कायद्यानं ओव्हरटाईम नाही. सक्तीची तर नाहीच पण व्यवहारात ती नाही केली तर नोकरी जाते. खासगी नोकऱ्या करणारांनी सांगावं, मी यात काय खोटं बोलतो ते ! अशा वातावरणात कुठलं आलंय्—'आवड असली की सवड असते' वगैरे.

मला पोटाच्या व्यवसायातून दोन गोष्टींचं चांगलं ज्ञान मिळत गेलं. एक, वाचन–दुसरं भाषा. मग पुढलं सुचायला लागलं. व्यवसायात लेखकांशी संबंध येत. संपादक बघायला मिळत. त्यामुळं वाटायला लागलं की ही सुद्धा माणसंच आहेत. माझ्या सारखीच नाक–कान असलेली. पण पुष्कळदा त्यांच्या पदव्यांचे थर

पाहून ही आपल्यापेक्षा खूप वेगळी आहेत असे वाटे. पण कैकदा माझ्याही लक्षात येणाऱ्या त्यांच्या भाषेतील चुका पाहून त्यांच्या-आपल्यात फारसा फरक नाही असाही दिलासा मिळे. त्या अंड्सन्ड वयात मला तेवढाही दिलासा पुरेसा असे. यामुळं मी वेळ सापडेल तसा लिहीत असे. डोकं-पोटाच्या दुखीची कारणं सांगून ओव्हर-टाईमला चाटा देत असे. हे मालकांना कळल्यावर माझ्या नोकऱ्या जात असत. पण ज्या नेमक्या वेळी नोकरी सुटत असे, त्यावेळी मला कोण आनंद होत असे, ते आता नाही सांगता यायचं. सांगायचच झाल्यास, सरकारी पारितोषिकाचा आनंद यापुढं फिका असे-असं सांगता येईल. कारण नोकरी गेल्यावर सिगारेटला महाग होईपर्यंत मी मस्तपैकी वाचना-लेखनात वेळ घालवत असे. नोकरी पहायच्या निमित्तानं नोकरीवर नियमानं जाणाऱ्यांसारखा वाचनालयात जाऊन बसत असे. चपराशी हाकलून लावेपर्यंत उठत नसे. रात्री लिखाण नामक रेघोट्या ओढण्यात रॉकेल, कागद नि रक्त घालवत असे. साधारणतः कितीही पानांची कथा असो-पूर्ण केल्याशिवाय उठत नसे, झोपत नसे. दुसऱ्या दिवशी ती पोष्टात पडायला हवी असे. तसं झाल्यापासून मनोरे सुरू होत. उद्याला मिळेल, परवाला वाचली जाईल, फारच फार तेरवाला. आवडली तर 'सोमवारी' पत्र येईल. 'सोमवार' टळल्यावर 'न कळवताच छापणार असतील. या रविवारच्या अंकात कदाचित् येईल,' वगैरे वाटत असे. या भरंवशावर कधी कधी त्याच साप्ताहिकाकडे दुसरीही कथा रवाना केली जात असे. मनोरे म्हणत, आपल्या अशा लागोपाठ कथा छापायला आरंभ झाला की नोकरीचीही गरज पडणार नाही. (कारण त्यावेळी माझ्या कथांना कितीही मोबदला मिळाला असता तरी चार कथात निघण्याइतका पगार मला मिळत असे.) पण एक कोणता तरी दिवस भूकंपात उतरंड आदळावी तसा माझे मनोरे चक्काचूर करून टाकत असे. एखादा तर तोवर पाठविलेल्या सर्वच्या सर्व कथा माझ्या हवाली करीत असे. तरी मी जिद्द सोडत नसे. कारण इतरत्र काही गत्यंतर नसे. त्या अवस्थेत नसावा तो स्वाभिमान, अहंकार म्हणा हवं तर-मला नोकरीतला प्रत्येक क्षण जिवावर उदार करीत असे. जीव देणं शक्य नसे. म्हणून हा उपद्व्याप करीत असे.

पण काही दिवसांनी तो उपद्व्याप नसून 'तपश्चर्या' की काय म्हणतात, ती असल्याचा शोध लागला. चिडून, चळफळून, संतापून खराब केलेल्या कागदांना संपादक छापू लागले नि वाचक ते साहित्य ठरवून मला साहित्यिक मानू लागले. निदान मला तरी असं वाटतं. व्याख्यानांच्या निमंत्रणांवर 'आपल्यासारखे मान्यवर साहित्यिक' वगैरे लिहिलं असतं. साहित्याच्या मागणीत तर 'थोर' वगैरेही असतं. म्हणून मला वाटतं, आपणही निदान 'साहित्यिक' समजायला काही हरकत नाही. एवढ्या धडपडीचा हाही मोबदला नको ? मला तो जिवाइतका प्रिय आहे. त्यानं मला सारं दिलं आहे. भरपूर पगाराची चांगली नोकरी. पद्मश्री

डॉ. पटवर्धनांसारख्या विचारवंतांचा सदैव सहवास. सौ. ताई पटवर्धनांसारख्या ममताळू मातेचं सदैव कौतुक. प्रकाशित झालेलं पुस्तक आस्थेनं वाचून त्यावर वाटलं ते निःसंकोचपणे लिहून कळवणारी साहित्यिक अन् रसिक मित्रमंडळी. मी काय लिहितो व काय लिहिण्याच्या विचारात आहे वगैरे मधून मधून विचारणा करणारी प्रकाशक मंडळी. 'बाई विना बुवा'सारखी कादंबरी लिहून तुम्ही स्थान सोडलं आहे म्हणून खडसावणारी आणि 'घग,' 'अगतिका' दहाव्यांदा, बाराव्यांदा वाचायला घेतली आहेत म्हणून प्रत्येक वेळी पत्रं टाकणारी काहीशी भावडी वाचक मंडळी. "तुमचं 'वऱ्हाडी माणसं' मला फार आवडलं" किंवा "तुमची कोणकोणती नाटकं प्रकाशित झाली आहेत ते कळविल्यास आभारी होईन" वगैरेसारखं लिहिणारी, मी ज्या 'गावाला' गेलो नाही त्या गावाची वाट पुसणारी अनाहूत मंडळी; आणि हेवा-मत्सरानं पेटून आवश्यक तिथंही मुद्दाम अनुल्लेखाचे घाव घालणारी, बाजूस सारणारी किंवा दडपू पाहणारीहि मंडळी मला याच साहित्यानं दिली आहे. पहिल्या प्रकारातल्या मंडळींबद्दल मला जसा फारसा अभिमान नाही तसाच दुसऱ्या प्रकारातल्याहि मंडळींबद्दल राग, हेवा वा संताप नाही. कारण पहिली आहेपेक्षा मोठं करू शकत नाही, तशी दुसरी लहान करू शकत नाही.

मी लिहायला लागल्यापासून लिहितो आहे. खरं तर पूर्वी लिहीत होतो. आता लिहवला जातो. दोन्ही अर्थांनी. व्यावहारिक नि मानसिक. नाही तर मी मरेन. चारही अर्थांनी. व्यावहारिक, मानसिक, लौकिक व कदाचित् शारीरिकहि. इतकं लिखाण माझ्या जीवनात भिनलं आहे. त्यामुळं आतापर्यंत छापील सव्वाचार हजार पानांचं लिखाण माझ्याच्यानं झालं आहे. केवळ व्यावहारिक अर्थानं लिहिलं असतं तर 'नांदतं घर'चा सिनेमावाल्यांशी करार झाला असताना 'बाई विना बुवा'सारख्या कादंबरीला हात लावला नसता. सव्वाशे पानांच्या कादंबरीवर सारीकडून मिळून तीन हजारापर्यंत रक्कम नि 'स्वत्'लौकिक मिळत असताना पावणे चारशे पानांची, किंमत खूप असल्यानं जेमतेम पैसा देणारी कादंबरी कशाला लिहिली असती ? अजून अशाच कादंबऱ्या माझ्या डोक्यात आहे. त्या मी लिहिणार आहेच. माझ्या मानसिक समाधानाकरता त्या मला लिहाव्या लागणार आहेत. मग कुणी मला अश्लिल लेखक म्हणतील, कुणी विकृत म्हणतील, कुणी जेलचा धाक दाखवील-एखादा रवानगीहि करण्यात समर्थ ठरेल-ठरो. पण मी लिहिणार आहे. कसलाहि विधिनिषेध व धाक-दरारा न ठेवता मी लिहायचं ठरवलं आहे.

लिहिताना मी काही नवं सांगत असेल असं नाही. माझ्या हेतूबद्दलहि अगडबंब शब्दात मला सांगता यायचं नाही. लेखकानं दार्शनिक, तत्वज्ञ, बोध-दुर्बोध

नि नवे-जुनेवादी असावं की नाही हे मला माहीत नाही. मी आपल्या परीनं जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करायचं ठरवलं आहे. एखाद्या संपूर्ण जीवनातून किंवा त्याच्या बारीकशा तुकड्यातून मी स्वतःच्या दृष्टीनं अर्थ काढतो. 'धग' मधली कौतिक वेडी का होते, ते मी माझ्या तर्काच्या सहाय्यानं सांगितलं आहे. एकेकाळचा प्रियकर असलेला 'वसंत' महारोग झाल्यावर शांताला असायलम-मध्ये एका विद्रुप महारोग्याच्या हवाली करून स्वतः कसं दुसरं लग्न करतो ते मी नुसतं 'शांता'ला असायलममध्ये प्रत्यक्ष पाहून 'अगतिका' जुळवली आहे. तिथं वसंतवर कोणताही अन्याय केला नाही. शांताविषयी अति अशी आपुलकी दाखवली नाही. त्यांच्या ठिकाणी मीहि तसाच वागलो असतो. 'माणूस' असलेली प्रत्येक व्यक्ती तशी वागली असती. वागताहेत. मी पहातो आहे. 'सरू'च्या वेश्या होण्यात समाजाच्या बेजबाबदारीचं प्रमाण किती अन् स्वतःच्या वैषयिक आसक्तीचं किती ते मी कुणावरहि अन्याय न करता, कथानक घडवावयासाठी पात्राच्या केशरचनेतहि बदल न करता जसंच्या तसं सांगण्याचा प्रयत्न केला आहे. 'कारली ती कारली' मधील म्हातारी स्वतःच्या स्वभावामुळं कशी सोन्या-सारख्या मुलाला दोष देऊन गावभर चरत सुटते ते कुणाची कड न घेता नि कुणावर अन्याय न करता सांगितलं आहे.

माझ्यावर कित्येकदा 'पाल्हाळाचे' खापर आदळले जाते. त्यामुळं ही माणसं ललित कलाकृतीला तात्विक ग्रंथोवा समजून वाचायला घेतात की काय, अशी मला शंका येते. कारण ललित कलाकृतीच मुळी किंचितशा अपक्व वाचकांसाठी असते. त्यांना रमवत-करमवत पचेल ते नि तेवढं भरविण्यासाठी कलाकृतीतील 'लालित्य' असायला हवं. ते नसलं तर ही माणसं वाचतील कशासाठी? आशयासाठी? तत्वासाठी? तर मग त्यासाठी ललित कलाकृतीचीच काय गरज आहे? तीन-चारशे पानांच्या कादंबरीत सांगायचं ते चार वाक्यातच का सांगून मोकळं होऊ नये? त्यासाठी ललित-लेखकांचीच काय आवश्यकता आहे? तत्वज्ञ, विचारवंतांची पुस्तकं काय कमी आहेत? म्हणून मला आपलं वाटतं, जे सांगायचं ते. ज्यांना सांगायचं त्यांना समजण्यासारख्या वाङ्मय प्रकारात सांगायला हवं. विश्वासात घेऊन सांगायला हवं. वाचताहात ते लेखकाचं नसून-पात्राचं नसून, तुमचं सुद्धा आहे असं सतत वाटत ठेवत सांगायला हवं. तेव्हा थोडा विस्तार हा येणारच. उसके सिवा मजा नही.

असंहि नाही. प्रौढी म्हणून नाही सांगत. सांगतो ती एक घटना आहे. एका मुंबईच्या नियतकालिकानं 'बाई बिना बुवा' वर असलंच खापर फोडलं होतं. लिहिणारी बाई होती. जिचे-माझे फार चांगले संबंध आहेत. अभिप्रायानंतरच्या भेटीत मी तिला शक्य तितक्या नम्रपणे म्हणालो,

" तुम्हाला पाल्हाळ वाटणारी वर्णनं काढलीत तर कादंबरीच्या कथावस्तूला कुठं धक्का पोचणार नाही याची खात्री आहे काय ? "

यावर ती 'तसं मला नक्की सांगता येणार नाही' वगैरे म्हणून गप्प बसली. याशिवाय ती काही करणार नाही याची मला खात्री होती. (अर्थात् मनात आणलं तर मीच अर्धी कादंबरी उडवून सुद्धा कथावस्तूला धक्का पोचू देऊ शकत नाही. पण हे इतरांचं काम नाही हे निश्चित.) या अहंकारानं म्हणा, प्रौढीनं म्हणा, लोक वाचतात म्हणून म्हणा—मी लिहितो आहे. तसंच नुसताच हवा तेव्हा पेन उचलत नाही. चांगलं खदखदायला लागलं म्हणजेच लिहितो. डोक्यात मजबूत झालं म्हणजे लिहितो. (तथापि माझी गति पाहून कुणाला मी पैशासाठी लिहीत असावा असं वाटण्याचा संभव आहे. सुदैवानं सध्या तितकी माझी दुर्दशा नाही. तो काळ संपला आहे) म्हणून असावं. माझ्या कादंबऱ्या हिंदीतून आल्या आहेत. श्री. रा. र. सर्वटेंनी त्यांच्या अनुवादाचे काम केले आहे. श्री. मधुकरराव राजे यांनी 'अगतिका'चा इंग्रजी अनुवाद संपवला असून सध्या ते 'वग'च्या मागं लागले आहेत. येत्या उन्हाळ्यात दोन्ही कादंबऱ्या इंग्रजी होऊन बाहेर पडतील.

नाटकाबद्दल नाक साफ नकटं आहे. या युगात याच्यासारखी लाजिरवाणी गोष्ट नाही. लेकीन हर्जा नही. अजून काही हातात काठी आली नाही. ती फार-फार लांब आहे. कारण मला अद्याप पस्तीसावंहि लागायचं आहे. शास्त्रज्ञ म्हणतात, " लेखकाचं खरं कर्तृत्व चाळीशीनंतर प्रकट होतं—" जगलो तर वाट पाहीन. कारण उमेद सळसळत आहे.

अनुक्रमणिका

चार कविता

१ माझी पुर्नामाय

माझी पुर्नामाय लोका दूध पाजीत वाहेते
तीच्या थेंबाथेंबातून गोड अमृत झरते
इथं काळ्या मातीमंदी दडे पंढरीचा बुका
कौलारू छपराखाली नांदतात भोळे तुका
पाठीशी तो सातपुडा उभा माया पांघरून
आली गंगामाय इथं हिरदाच्या आसऱ्यानं
रोज ठेचा भाकरीत त्याले आहे समाधान
शिजे दिवाई सनाले चुलीवरती पुरन
रातंदिस अभिसेक निढळाच्या रं घामाचा
तुरमुगाच्या वयानं वास नित लक्षुमिचा
सोनं झयके उम्बीय मोती काणून दाण्यात
'हिरे लाल' गोठ्यामंदी चांदी हासे कापसात
झाली आंबराई लाल बोल निघे कुहूकुहू
रसासाठी बहिणीले आनं दमणीत भाऊ
अरे इथली जिजाऊ राहे शेवा पदरानं
शिवराया तो अर्पिला मायभूमीसाठी तीनं
बोली घोकून काढली सहेदाच्या कांद्यातून
रोज ओवी अभंगात निघे पहाट न्हाऊन

२

किती चोखयांना विठू
ठेविले तू पायरीशी
आता तिष्ठत राही तू
पुंडलीकाच्या दाराशी

वि. भी. वाघ

३ प्रवास

मोरपिसाच्या डोळ्यांनी न्याहाळत
वार करतो जेव्हा इन्द्रधनुची चढण
ओठी आणून मंदस्मित् चंदेरी
स्वागत करीत असते माझे
रंगलेले क्षितिज.
आणि दाखविते वाट नवी
रंगीबेरंगी नकाशातून
तुडवित काळोख
एक एक दगड टाकित मागे चांदण्यांचा
सुरू होतो पुन्हा प्रवास माझा
अनंताचा !

४

नाचता नाचता
भिजे वाळवंट
आणि सुरवंट आकाशतो

इंद्रायणी मुखे
गाता तुझी गिते
वाणी मधाळते रेड्याचीहि

तुझे पाहता मी
रूप लोचनात
कशाला अनंत शोधू न्यारे ?

शबरीची बोरे

विश्वरूपदर्शन

बाळपणी श्रीकृष्णाने माती खाल्ली असा आरोप करून खरे-खोटे सिद्ध करण्यासाठी यशोदा मातेने त्याला तोंड उघडायला सांगितले, त्यावेळी यशोदेला श्रीकृष्णाच्या उघडचा तोंडात सारे विश्व समावले आहे असे दिसून आले आणि ती आश्चर्याने स्तंभित झाली, ही गोष्ट आपल्या परिचयाची आहे. श्रीकृष्णाच्या तोंडात यशोदेला दिसलेले विश्व कसे होते त्याची वर्णनेहि कथा-पुराणामधे दिलेली आहेत. ती वाचली म्हणजे माणसाची मती गुंग झाल्यावाचून राहात नाही.

विश्वोत्पत्ती आणि विश्वाचे स्वरूप ह्यासंबंधी जगात प्रचलित असलेल्या निरनिराळया धर्म-ग्रंथात आणि दर्शन-शास्त्रात तऱ्हेतऱ्हेने उहापोह केलेला आढळतो.

तिबेट हे फार पुरातन काळापासून अनेक गूढ विद्यांचे माहेरघर मानले जाते, येथील लोक रूढार्थाने 'बौद्ध'—म्हणजे बुद्धानुयायी असले तरी, त्यांचा एक विशिष्ट पंथ आहे, विशिष्ट धर्म-शास्त्र आहे आणि विशिष्ट दर्शनहि आहे. ह्या तिबेटी लामाप्रणित दर्शन-शास्त्राप्रमाणे आपल्या ह्या विश्वाचे रूप कसे आहे ते एका ठिकाणी अचानकच वाचायला मिळाले. मनोवेधक वाटल्यामुळे ते ह्या ठिकाणी उद्धृत करीत आहे आत्मकथनाच्या रूपाने हा भाग आलेला आहे. शिष्य सांगतो आहे :—

" पर्वत-श्रेणींच्या मागे सूर्याची शेवटची किरणे अंतर्धान पावली, आणि त्याबरोबर तुतारीचा गंभीर नाद वातावरणात घुमू लागला. त्याच्या पाठोपाठच खालच्या मंदिरातून शेकडो कंठातून एका स्वरात उच्चारले जाणारे मंत्रोच्चार कानी येऊ लागले. पाहता-पाहता दिवसाचा उरला-सुरला अंधुक प्रकाशहि विरून गेला आणि दुसऱ्या क्षणीच आकाशातली ग्रह-नक्षत्रे आणि तारे निळचा-जांभळचा पार्श्वभूमीवर हिऱ्यांसारखे उज्ज्वल दीप्तीने लकाकू लागले. एक उल्का आकाशाचा एक भाग उजळून काढीत पृथ्वीच्या रोखाने लखलखत निघाली आणि धूर ओकीत असलेल्या मूठभर धुळीच्या रूपाने कुठेतरी जाऊन पडली.

" फार सुंदर दिसते आहे ही रात्र, नाही ?" माझ्यावर अपार प्रेम करणाऱ्या गुरुदेवांचा स्वर माझ्या कानी आला.

"खरोखरीच, फार सुंदर!" म्हणत मी माझ्या गुरुदेवांना अभिवादन करण्यासाठी धडपडत उठून उभा राहिलो.

गुरुदेव माझ्याजवळ येऊन बसले आणि मलाहि बसायला सांगून म्हणाले, "तू, मी, जगातली दुसरी माणसं, आपणहि आकाशातल्या ह्या चांदण्यांसारखेच दिसत असू, ह्याची तुला कल्पना आहे का?"

रात्रीच्या वेळी आकाशात चमचमत असलेल्या चांदणीसारखा मीहि दिसत असणार? हे कसे शक्य होते? मी भांबावल्यासारखा होऊन गुरुदेवांच्या तोंडाकडे पाहू लागलो. त्यांची शरीरयष्टीहि चांगली धिप्पाड होती. ते दिसायलाहि सुरेख होते. त्यांचे कपाळ किती भव्य आणि विशाल होते.—पण तरीहि ते ताऱ्यासारखे कसे दिसू शकणार?

माझ्या भांबावलेल्या मनःस्थितीची कल्पना येऊन गुरुदेव किंचित् हसले व म्हणाले, "प्रत्येक गोष्टीचा नुसता शाब्दिक अर्थ तेवढा पाहण्याची तुझी सवय काही जात नाही!—माझ्या बोलण्याचा आशय असा होता की वस्तू डोळ्यांना दिसते तशीच ती खरोखरी असते असं काही नाही. एक उदाहरण देऊन मी तुला समजावून सांगतो.—समज, आपण बसलो आहोत त्या डोंगराखालच्या ह्या सबंध लांबलचक दरीवर तू 'ॐ मणि पद्मे हुं' ही अक्षरं—खूब मोठमोठाली, दरी एवढी मोठाली—लिहून काढलीस तर ती काही ल्हासातल्या लोकांना वाचता यायची नाहीत. कारण एका एका अक्षराचा विराट आकार त्यांच्या आकलनशक्तीच्या पलीकडचा असणार. लक्षात येतं आहे ना तुझ्या?—जसं त्या अक्षरांचं, तसंच ह्या ताऱ्यांचंहि आहे. ते खरोखरी आहेत कसे अन् काय, ते त्यांच्या विराटत्वामुळे आपल्याला आकलन करता येत नाही आणि त्यांचा आलेखहि आपल्याला कळू शकत नाही.

"मी पुरा गोंधळून गेलो. गुरुदेव काय सांगताहेत ते माझ्या लक्षात येईना. तारे म्हणजे तारे! त्यांचा आलेख कसला? आणि हे सारी दरी भरून जाईल एवढ्या मोठ्या अक्षरात लिहिणे! छेः!

"गुरुदेव पुन्हा सांगू लागले. ते म्हणाले, "कल्पना कर की तुझा देह आटत चालला आहे, तू अगदी लहान-लहान बनत चालला आहेस. होता-होता तू वाळूच्या कणाएवढा लहान झाला आहेस अशी कल्पना कर. त्या अवस्थेत मी तुला कसा दिसेन?-आता, त्यापेक्षाहि तू लहान बनला आहेस अशी कल्पना कर,-एवढा लहान की त्या अवस्थेत तुला वाळूचा कण देखील पृथ्वीसारखा मोठा दिसायला लागेल. त्या अवस्थेत तुला मी कसा आहे असं वाटेल?—सांग ना! मी कसा दिसेन तुला, त्या अवस्थेत?"

अनुक्रमणिका

" माझी मति गुंग झाली. माझी विचारशक्ति निष्क्रिय बनली. ' आ ' वासून मी नुसता गुरुदेवांकडे पाहात राहिलो.

गुरुदेव म्हणाले, " तुला मी कसा दिसेन ते सांगतो. अंधारात गरगरत असणाऱ्या, एकमेकांपासून विलग अशा अनेक पृथ्वीच्या समूहासारखा मी तुला त्या अवस्थेत भासेन. तुझ्या अत्यंत लहान आकारामुळे तुला माझ्या देहातील एक एक अणु वेगळा वेगळा, एकमेकापासून विलग असलेला असा दिसू लागेल. एका पृथ्वीच्या भोवती अनेक पृथ्व्या प्रदक्षिणा घालताहेत असे दृष्य तुला दिसायला लागेल. तेथे अंतःशक्तीचे केंद्र असलेल्या कणांचे सूर्यरूपानेहि दर्शन होईल. थोडक्यात सांगायचं म्हणजे माझ्या देहाच्या ठायी तुला संपूर्ण विश्वच दृष्टिगोचर व्हायला लागेल. "

माझे डोके गरगरायला लागले.

" बेटा, तुझा बराच गोंधळ उडाला आहे असं दिसतं. " गुरुदेव किंचित् हसून म्हणाले, " तुझ्या अंगावरच्या ह्या वस्त्राकडे पहा. त्याच्यावरून हात फिरवून त्याला स्पर्श कर. कसा मऊ, गुळगुळीत लागतो आहे हा कपडा, नाही ? आता ह्याच कपडयाकडे तू, वस्तूला दहापट मोठी करून दाखविणाऱ्या जाड भिंगातून पाहा. काय दिसेल तुला ? प्रत्येक धागा जाड, आणि धाग्या-धाग्यामधे बरेचसे अंतर ! वस्त्र तेच, पण आता त्याचं रूप बदलले ! –आता कल्पना कर, तू ह्याच कापडाकडे त्यापेक्षाहि अधिक शक्तिमान-लाखपटीने शक्तिमान अशा भिंगातून पाहतो आहेस. आता तुला एक एक धागा कितीतरी मोठा, त्यावरून चढून जायलाहि कठिण एवढा मोठा दिसायला लागेल. आणि धाग्या-धाग्यामधील अंतर ? त्यातून तर तू घोडयावर बसूनहि सहज पलीकडे जाऊ शकशील एवढे मोठे ते आहे असं तुला वाटायला लागेल ! "

" आता माझ्या डोक्यात थोडा-प्रकाश पडू लागला. विचार करीत काही वेळाने मी म्हणालो, " म्हणजे,—म्हणजे आपलं हे जग,—नुसतं अपरंपार आकाश अन् त्यात मधून मधून पृथ्व्या तरंगताहेत, असंच ना हे आपलं विश्व ? "

" इतकं सोपं नाही ते, बाळ ! —तू जरा आरामात बैस ! आपल्या अति-प्राचीन, पुरातन पूर्व-पुरुषांनी मिळविलेलं ज्ञान जे अगम्य गुहेत जमा करून ठेवलं आहे ते मीहि पाहून आलो आहे. ते मी तुलाहि सांगणार आहे. "

" पुरातन पूर्व-पुरुषांचं ?—गुहेत त्यांनी...

" हो, हो !—सारं काही तुला कळेल. पण त्याच्या अगोदर मनुष्य आणि जीवन ह्यांच्या बद्दलची आपली चालू असलेली चर्चा तर पुरी होऊ दे ! "

" सांगा, सांगा, गुरुदेव ! मी ऐकतो आहे, समजून घेतो आहे. "

अनुक्रमणिका

गुरुदेव सांगू लागले. ते म्हणाले, " हे आपलं संपूर्ण जगत् नुसत्या कंपन-लहरींचं बनलेलं आहे. चर, अचर, जे जे म्हणून आहे ते सारं कंपन-लहरींनी भरलेलं आहे! समोर उभा असलेला हा पर्वतराज हिमालय, हा सुद्धा आकाशात तरंगणाऱ्या अनंत वेगवेगळ्या परमाणूंच्या समुदायाव्यतिरिक्त दुसरे काही नाही. हे परमाणु तरंगत आहेत, गरगरत आहेत, पण ते एकमेकाला स्पर्श करू शकत नाहीत. सारं विश्वच म्हणजे परमाणूचा समुच्चय. प्रत्येक दुसऱ्यापासून वेगळा. सूर्याभोवती जशी दुसरी जगे घिरट्या घालीत फिरत असतांना, ती आपल्या कक्षा कधी सोडीत नाहीत की कधी एकमेकांना स्पर्श करीत नाहीत, तसेच उत्पन्न झालेल्या प्रत्येक वस्तूचेहि आहे. आपापल्या कक्षेत नुसते गरगरत राहणारे कण! आणि ह्या प्रत्येक परमाणूच्या ठायी गतीप्रमाणे एक प्रकारची विद्युत शक्तीहि वास करीत असते. ह्या दोन गोष्टी दोन असूनहि एकच आहेत. कारण गतीशिवाय विद्युत्प्रवाह निर्माण होणे शक्य नाही.

" ह्या विषयावर आणखी किती तरी सांगण्यासारखं आहे." गुरुदेव म्हणाले. " आपल्या पूर्वजांनी प्राप्त केलेलं ज्ञानाचं भांडार अपूर्व आहे आणि ते सारं ते आपल्या उपयोगासाठी ठेवून गेलेले आहेत. अधिकारी व्यक्तीला ते आजहि सुलभ आणि सुगम्य आहे. त्याची किंचितशी रूपरेषा मी आज तुला निवेदन केली आहे. पुढे कधी प्रसंग आला म्हणजे आणखीहि सांगेन. आज आता इतकेच पुरे. रात्र वरीच झालेली आहे. तेव्हा सांगितलेल्या गोष्टीवरच विचार करीत आता स्वस्थ झोपी जा!"

एवढे बोलून गुरुदेव उठले. मीहि उठलो आणि त्यांच्या मागोमाग मीहि गुंगीत असल्यासारखा चालू लागलो.

—शबरी

अनुक्रमणिका

युगवाणीचा पत्रव्यवहार

श्री. रा. रा. संपादक 'युगवाणी' यांस, स. न. वि. वि.

आपल्या मे-जून १९६५ च्या अंकात श्री. मुक्तिबोध यांचे पत्र प्रसिद्ध झाले आहे. श्री. गोडसे यांच्या 'पोत'कडे त्यांनी लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे आणि तोहि 'चर्चा घडून यावी' या उद्देशाने केला आहे. तसे करीत असता त्यांनी माझ्या 'पोत'वरील टीकेचा उल्लेख करून काही अपेक्षा व्यक्त केली आहे. तेव्हा अधिक चर्चा व्हावी या हेतूनेच मीहि 'पोत'बद्दल व त्यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेबद्दल दोन शब्द लिहीत आहे.

सुमारे एक वर्षापूर्वी नागपूर आकाशवाणीवर माझे 'पोत'वरील समीक्षण ध्वनिक्षेपित झाले होते. ते अर्थात् त्रोटक व अत्यंत संक्षिप्त होते. एका मोठ्या परीक्षणाचा तो एक अग्रदूत होता असेहि मी म्हणू शकेन. श्री ह. वि. मोटे यांच्या इच्छेनुसार मी त्यावर सविस्तर परीक्षण लिहीत असता, मध्येच व्यक्त झालेले ते छोटेसे मतप्रदर्शन होते. हे मोठे परीक्षण, माझ्या इतर उद्योगांमुळे लिहावयास उशीर झाला म्हणून व मासिकांच्या आवाक्याबाहेरचे झाले म्हणून प्रसिद्ध होऊ शकले नाही. या परीक्षणाची टंकमुद्रित ७३ पाने झाली आहेत. त्यात श्री. गोडसे यांच्या सर्व प्रमेयांचा साधकबाधक विचार करून 'पोत' मध्ये प्रमाद, भ्रम, अज्ञान इ. चा विलास कसा आहे हे यथामती मी दाखविले आहे. श्री. गोडसे यांच्याकडे, श्री. ह. वि. मोटयांच्या द्वारे हे परीक्षण पाठवून बरेच महिने झाले. त्याबाबत त्यांच्याकडून मला आतापर्यंत काही कळले नाही. श्री. मुक्तिबोधांना अर्थात या सविस्तर परीक्षणाची कल्पना नसावी व त्यांनी केवळ आकाशवाणीवरील भाषणाच्या आधारे माझ्या भूमिकेबद्दल लिहिले असावे हे उघड आहे. असो.

श्री. मुक्तिबोध म्हणतात, की श्री. गोडशांचे प्रमेय त्यांना मान्य आहे; पण त्यांचा आक्षेप हा आहे, की श्री. गोडशांची ऐतिहासिक मीमांसा द्वंद्वात्मक भौतिकवादी (dialectical meterialism) नाही व त्यांनी समाजाच्या गतिशीलतेच्या चर्चेत वर्गीय दृष्टिकोणाचा घ्यावा तसा आधार घेतलेला नाही. गोडसे म्हणजे प्रणीत कलामीमांसेचा तोंडवळा फक्त मार्क्सवादी आहे व गाभा मात्र मार्क्सवादी नाही, असा त्यांच्या आक्षेपाचा सारार्थ आहे.

माझ्या मते श्री. गोडसे व श्री. मुक्तिबोध यांची विचाराची दिशा चूक आहे, अशास्त्रीय आहे व प्रत्यक्ष मार्क्सवादालाहि बदनाम करणारी आहे. "ज्या ऐतिहासिक दृष्टीच्या आधारावर श्री. गोडसे यांनी कलेचा विचार केला आहे, ती ऐतिहासिक दृष्टीच मुळात चुकीची आहे व भारतीय इतिहासास लागू होऊ शकत नाही. भारतीय कलेचा विचार भारतीय इतिहासाच्या दृष्टीनेच व्हावयास पाहिजे. डॉक्टरसाहेबांनी भारतीय ऐतिहासिक दृष्टि व भारतीय कला यावर आपले विचार मांडले तर एका नव्या दृष्टीने अभ्यासास सुरुवात करता येईल." असे जे श्री. मुक्तिबोध यांना वाटते, त्यालाच अनुसरून मी थोडे स्पष्टीकरण करीत आहे. श्री. गोडसे यांच्या इतिहासदृष्टीत मला मुख्य चूक वाटते ती अशी, की इतिहास व कला यांच्या विकासाचे जुनाट समज (Unilinear evolution, prelogical primitiveness, naturalism इ. इ. एवढे मात्र लक्षात ठेविले पाहिजे, की ते प्रत्यक्ष शब्दात मूर्त झाले नाहीत, पण त्यात खूप डोकावतात !) ते टाकीत नाहीत व असिद्ध ठरलेल्या निदान पूर्वीसारख्या अबाधित न राहिलेल्या–कल्पना ते कवटाळून बसले आहेत. माझे मुख्य म्हणणे हे आहे, की इतिहास व कला यांचे जागतिक टप्पे ठरविण्याच्या अगोदर प्रत्येक देशाचे व समाजाचे स्वतंत्र संशोधन करून त्यांचे टप्पे ठरविणे अगत्याचे आहे. त्यानंतर सर्वांची जुळणी करून जागतिक विकासाच्या अवस्थांचा नियम बांधण्याचा खटाटोप. इतरत्र आढळून आलेले टप्पे जसेच्या तसेच उचलून ते भारतवर्षाच्या इतिहासास व कलेस बळेच लावून दाखविणे ही पद्धति अशास्त्रीय आहे. एकतर इतिहास व कला यांचे जागतिक टप्पे असू शकतील काय हाच मुळी एक कूट प्रश्न आहे आणि दुसरे असे, की तसे ते असल्यास मानवी ज्ञानाने आज अशी पातळी गाठली आहे काय, की जिच्या बळावर अशा ठरीव टप्प्यांची चौकट उचलून तिच्यात हव्या त्या देशाचा इतिहास व कला यांचा विकास चपखलपणे फसविता येईल. प्रो. लुवी या सुप्रसिद्ध मानवशास्त्रज्ञाने अशाच संदर्भात अभ्यासकांना जे बजावून सांगितले आहे, तेच मीहि म्हणतो. तो म्हणतो, "Ours should be the caution of a geologist who, having established his strata in one continent, does not promptly leap to their identification with comparable phenomena elsewhere........The sounder approach will be to work out the sequence for each area in complete independence of the pigeon holes suitable elsewhere and ultimately to combine all findings in a world-scheme." (The History of Ethnological Theories, P. 195) माझा आग्रह हा आहे, की काही देशांच्या बाबतीत उपयुक्त व वास्तव वाटणारे अवस्थांचे गणित बाजूस ठेवून अगोदर भारतवर्षाचा पूर्वग्रहरहित बनून स्वतंत्रपणे

अभ्यास झाला पाहिजे. आणि तसे करावयाचे म्हणजे तो एकाच पद्धतीने होऊ शकेल. ती ही, की वरून व बाहेरून कोणत्याहि पूर्वनियोजित कल्पना न लादता आतूनच त्या उद्गत होऊ देणे; मग त्या उद्गत झालेल्या कल्पना पूर्वनियोजितांशी एकरूप, सदृश वा विसदृश कशाहि ठरोत. श्री. गोडसे यांची इतिहासदृष्टि व कलामीमांसा कोणतीच शास्त्रीयता दाखवीत नाही हेच माझे गाऱ्हाणे आहे आणि श्री. मुक्तिबोधांच्या मांडणीतहि तोच दोष आहे.

मला असे वाटते, की मार्क्सवाद ही शास्त्रीय विचारसरणी असेल, तर तिला शास्त्रीयतेची एक कसोटी मान्य असावयास पाहिजे. प्रो. हॉगबेनने आपल्या 'Dangerous Thoughts' मध्ये म्हटल्याप्रमाणे, मार्क्सवाद 'must live dangerously like other scientific hypothesis.' (P. 150). शास्त्रीय सत्ये केव्हाहि आत्मसंहार पत्करावयास एका पायावर जय्यत तयार असतात, तसेच मार्क्सवादाच्या बाबतीत, तो शास्त्रीय असला, तर कोणीहि अपेक्षील. ज्ञान वाढले, अनुभव विस्तारला, की शास्त्रीय सत्यहि बदलले पाहिजे. ते dogma बनता कामा नये. मूळ मार्क्सवादाची बैठक अशीच दिसते. त्या दृष्टीने मार्क्स व एंजेल्स यांची पत्रे अभ्यासण्याजोगी आहेत. एंजेल्सचे ते सुप्रसिद्ध पत्र, ज्यात त्याने मार्क्सवादाच्या अपुरेपणाची ग्वाही दिली आहे, ते मननीय आहे. राजकारणातले डावपेच, पक्षाभिमान इ. इ. प्रसंगांमुळे लिहिले गेलेले विपुल व वितंडात्मक मार्क्सवादी वाङ्मय बाजूस सारून त्यातील शास्त्रीय व प्रांजळ कबुली पाहिल्या, की हे लक्षात येते, की मार्क्सचा नियम अल्लाउद्दिनच्या 'तिळा उघड' सारखा साऱ्या इतिहासाची द्वारे सताड उघडणारा सर्वसमर्थ मंत्र नव्हे. मला वाटते, इतर कोणत्याहि मार्क्सवाद्यापेक्षा लेनिन हा कमी मार्क्सवादी खास नसावा. त्यानेच एका ठिकाणी अशी मोकळेपणाने कबुली दिली आहे. मिखाउलोव्हस्कीच्या अल्लाउद्दिनी चित्रणास लेनिनने खोडून टाकून हा खोटा समज दूर केला आहे, की मार्क्सने सर्व पूर्वेतिहास व सर्व घटना यांचा उलगडा करणारा नवीन सिद्धांत मांडला आहे (What The 'Friends of the People' Are). लेनिननंतर मार्क्सवादाची मूलभूत प्रगति थांबून गेली, तो एक dogma झाला व धर्माच्या अनुयायांनी वचनांची कुतरओढ करावी तशी मार्क्सवादी अनुयायांनी मार्क्सवादाची केली आहे असे म्हणण्यास आज पुष्कळ वाव आहे, असे मला वाटते. दुसऱ्या महायुद्धानंतरचा जगाचा इतिहास या दृष्टीने पुष्कळ खाद्य पुरवू शकेल !

मार्क्सचा नियम युरोपीय संस्कृतीच्या वाढीला धरून आहे असे, एकाकाळी मार्क्सवाद्यात प्रतिष्ठा व प्रामाण्य पावलेले हेकर सारखे लोक म्हणत आलेच आहेत. मिटिन व रासुमोव्हस्कीसारखे मार्क्सवादी विचारवंतहि असे मांडीत आले

आहेत, की वर्गरचनेवर उभ्या झालेल्या समाजास वर्गविग्रहाचा नियम लागू आहे. (Dialectical and Historical Materialism)

भारतवर्षाची समाजरचना वर्गविग्रहावर उभी आहे किंवा नाही हेच मुळी अजून ठरावयाचे आहे. मार्क्सच्या हिंदुस्थानवरील पत्रावरून स्पष्ट दिसते, की तो ही रचना वर्गीय मानीत नाही. वर्गविग्रहाची इतिहासदृष्टि हीच सर्वंकप दृष्टी आहे हे प्रमेय मी निरपवाद मानीत नाही. द्वंद्ववादी भौतिकवादास त्रिकालिक परिपक्वावस्था आली असेहि म्हणता येणार नाही. (मार्क्सवादाच्या दृष्टीनेच तो वदतोव्याघात आहे !) तेव्हा श्री. मुक्तिबोध यांचा आक्षेप भरीव व शास्त्रीय कसा म्हणता येईल ? अर्थात् या आक्षेपाचा समाचार श्री. गोडसे घेतील अशी आशा आहे !

भारतीय ऐतिहासिक दृष्टि व भारतीय कला यांच्या बाबतीत पुढील मुद्दे विचारार्थ मांडता येतील.

(१) भारतीय दृष्टीसमोर अनंत पूर्वकाळ व मानवी अनेक स्थित्यंतरे सदैव उभी राहतात. इतिहास व कला यांच्या अवस्थांचा विचार तदनुसार व्हावयास हवा. देश व काल यांच्या अल्प व महान मोजमापानुसार अवस्थांचे गणित बदलणे शक्य आहे. भारतीय अफाट वाङमयातून या सत्याची हवी तेवढी साक्ष मिळू शकेल.

(२) महाभारताने 'वार्तामूलो ह्ययं लोकाः' असे म्हटल्याप्रमाणे अथवा कौटिलीय अर्थशास्त्राने त्याच सत्याचा पुनरुच्चार केल्याप्रमाणे, भारतीय दृष्टिकोण मानवी जीवनातले अर्थव्यवहाराचे स्थान ओळखतो. विष्णुधर्मोत्तर पुराणाने तर स्पष्टच ग्वाही दिली आहे, की धर्म, अर्थ व काम या पुरुषार्थांचे धन हे मूळ आहे असे मनीषी म्हणतात; द्रविण हे मनुष्याचे बहिश्चर प्राणच होत. (धनं धर्मार्थकामानां मूलमाहुर्मनीषिणः । नृणां बहिश्चराः प्राणा द्रविणं च प्रकीर्तितम् ।। तृ खं. अ. ३३८) हे सत्य ओळखूनहि भारतीय दृष्टीस असे वाटते, की या बहिश्चर प्राणाइतकेच अंतश्चर प्राणास स्वतंत्र स्थान आहे. तो अंतश्चर प्राण म्हणजे मानवातील स्वयंभू निर्माणक्षम आत्मस्वातंत्र्य. इतिहास व कला यांचा विकास व विलास बहिश्चर प्राण व अंतश्चर प्राण या मिथुनाचा प्रपंच होय. जगाच्या घडामोडीपुरते या मिथुनाचे द्वंद्व अनादी आहे, नित्य आहे. कोणीच कोणात मोडले (reduce) जाऊ शकत नाही.

(३) भारतीय दृष्टीस प्रतीत होणारे विश्व म्हणा अथवा निसर्ग म्हणा विविध व व्यापक आहे. त्यामानाने आधुनिक विश्व वा निसर्ग फारच मर्यादित आहे.

(४) चार्लस एल. फेब्री या रसिक कलामीमांसकाने आवर्जून सांगितल्याप्रमाणे (Cultural Forum, Jan. 1964, p. 99), भारतवर्षाचा कलेति-

हास अजून तयार व्हावयाचा आहे. तसा तो तयार व्हावयास श्री. गोडसे यांची घेडगुजरी व बिनबुडी कलामीमांसा हातभार लावू शकेल असे मला वाटत नाही. हजारो वर्षांचे वाङ्मय व कलावशेष या सर्वांचा सर्व क्षेत्रांतला तपशीलवार परामर्श घेतल्याशिवाय भारतीय कलेच्या विकासावस्था व ऱ्हासावस्था मांडणे हास्यास्पद आहे. वाङ्मय (तेहि सर्व प्रकारचे), चित्र, शिल्प (माती, लाकूड, हस्तिदंत, दगड, धातु इ. तले – त्यात पुनः लेणी वगैरे आविष्कार) इ. चे वैदिक, बौद्ध, जैन, तदितर कलावंतांनी घडविलेले विश्व एवढे मोठे आहे, की छद्दंत जातकासारख्या सहेतुकपणे निवडलेल्या कसोटीने ते आकळले जाऊ शकत नाही. कालविस्तार, देशविस्तार व प्रांतागणिक जीवनाच्या विविध गती यांची सखोल छाननी झाल्याशिवाय भारतवर्षातील कलेस सुसूत्र व योजनाबद्ध गणितात बसविता येणार नाही. तसेच रसिक व कलावंत यांच्या हृदयाचा म्हणजे त्यांच्या भाव–विश्वाचा सांगोपांग अभ्यास केल्याशिवाय अवस्थांचे गणित बसविणे अशास्त्रीय आहे.

(५) भारतवर्षाच्या कलेस जणू भरहुतपासूनच व तोहि शिल्पापासूनच प्रारंभ झाला आहे, असे श्री. गोडसे यांचे मनोगत दिसते. त्यांना असे विचारता येण्याजोगे आहे, की भरहुतची कलावस्था अपकर्षाची आहे असे कां म्हणू नये ? छद्दंत जातकाचा शिल्प व चित्र यांतील आविष्कार हा केवळ एक अपघात आहे. मात्र तो श्री. गोडसे यांस कलामीमांसेचा यथाभिमत आभास निर्माण करता येण्याइतपत भाग्यप्रद ठरला आहे ! भारतीय कलेचा इतिहास घडविताना कलामीमांसकांच्या कशा करुण व दारुण चुका होतात, याची काही उदाहरणे मी देतो. श्री. अवनीन्द्रनाथ टागोर यांनी मानवांतील सौंदर्यलक्षणांचे संकेत निसर्गापासूनच कसे उचलले आहेत हे चांगले दाखविले आहे. (Some Notes on Indian Artistic Anatomy) चार्लस एल्. फेब्रीच्या मनात भरलेल्या प्रा. सरस्वतीने आपल्या 'A Survey of Indian Sculpture' मध्ये असे प्रतिपादन केले आहे, की गुप्तकाळात हे संकेत साकार व प्रतिष्ठित झाले. शिल्पाचा इतिहास यथायोग्यपणे सांगण्याची समर्थ धडपड करणाऱ्या या अभ्यासकाच्या लक्षात हे आले नाही, की हे संकेत महाभारतात भरपूर वापरले गेले आहेत. महाभारतात पुढे काही भर पडलेली असली, तरी त्याचे बृहत्स्वरूप बुद्धपूर्व कालातले आहे आणि त्यामुळे हे सौंदर्यदर्शक संकेत गुप्तकालापूर्वी कमीतकमी आठ नऊ शतकांपासून रूढ झाले आहेत; इतकेच नव्हे तर त्यातील काहींचे अस्तित्व मोहेंजोदारोच्या कलेतहि आढळते, हे प्रा. सरस्वतीनेच दाखविले आहे. खुद्द श्री. गोडश्यांची उदाहरणे तर पुष्कळच आहेत. 'अजंठा शैली', श्रीगजाननाचा काळ व तत्संबद्ध शिल्प, यादवकालीन इतिहास व श्रीज्ञानेश्वरी, कला व जीवन यांतील बिंबप्रतिबिंब न्याय इ. इ. बाबतीत श्री. गोडशांचा तर्कविलास 'सांकेतिक अवस्थे'तला आहे एवढेच थोडक्यात म्हणता येईल !

एकाग्रुढच्या एक नियतिवद्ध अशा अवस्था भारतात दिसत कशा नाहीत याचा एक नमुना सांगतो. गणराज गजाच्या आविष्काराने मारीच हरखून जाणारे श्री. गोडसे भरहुतचा व सांचीचा केवळ विचार न करता महाबलीपुरम् येथील किरातार्जुनीय लेण्याचाहि विचार करतील, त्यांना, Rene Grousset या फ्रेंच कलासमीक्षकाने म्हटल्याप्रमाणे, "Perhaps we may even say that here the Indian art of representing animals...... reaches its height. What majesty there is in the groop of elephants in adoration......where they seem to be presiding in the name of the animal kingdom over an august mystery." (Civilisations of the East, Vol. II, India, P. 232) या प्रकारे तिथेहि निसर्गनिष्ठताच आढळेल. प्रा. सरस्वतींनी तर तसे स्पष्ट म्हटलेच आहे (पृ. १६७). म्हणजे इ. स. पूर्व दुसऱ्या शतकाच्या भरहुतची निसर्गावस्था इ. स. नंतरच्या सातव्या शतकात पुनः अवतरली ! एकूण श्री. गोडशांच्या नियत व अवश अवस्थाक्रमांना मूठमातीच !!

अगदी थोडक्यात मी माझे म्हणणे मांडले आहे. अत्यंत खेदाची गोष्ट आहे, की, 'पोत' चा अभ्यासकांनी अगत्याने विचार करावा अशी शिफारस करणारे श्री. वेडेकर, श्री. मुक्तिबोध, श्रीमती दुर्गा भागवत इ. नी निव्वळ 'अहो रूपम् अहो ध्वनि' असे चालविले आहे. खोलात कोणीच शिरत नाही ! असो.

दि. १४-६-६५

आपला नम्र
व. स. येरकुंटवार

एका उत्तम संगीत नटाचा अस्त!

[सयाजीविजय–वडोदे १६–३–१९०१च्या अंकाचा मथळा]

भाऊरावांच्या संबंधाने लिहिताना सयाजीविजय पत्रातल्या पुण्याच्या बातमीदाराने एकंदर संगीत नाटकांची संगतवार हकीकत, या संबंधाने लोकांच्या मनावर झालेला परिणाम, संगीतकलेत व गायनविद्येत झालेला फेरफार यांचे चांगले विवरण केले आहे. ते पत्र त्यांच्या चरित्रात स्थळ देण्यायोग्य आहे. म्हणून जसेच्या तसे दिले आहे.

" संगीत नाटके "

(आमच्या पुणेकर बातमीदाराकडून)

पुणे, ता. ८–३–१९०१

अलिकडे संगीत नाटके पैशापासरी झाल्यामुळे म्हणा, त्यांच्याबद्दल कोणास फारसे महत्त्व वाटणार नाही, हे खरे आहे. परंतु संगीत नाटकांच्या पहिल्या पहिल्या दिवसात त्यांचे प्रस्थ किती माजले होते, हे जुन्या वर्तमानपत्रांच्या फायली चाळणारास तेव्हाच दिसून येते. अण्णा किर्लोस्करांचे मंडळीने थोडक्याच काळात किती पैसा मिळविला यावरूनहि हे लक्षात येणार आहे. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींवरून दहा दहा वीस वीस कोसांवरून लोक अण्णांचे नाटक पहाण्यास येऊन रुपयाच्या तिकीटास पाच रुपये देऊन, नाटकाची रात्र उभ्याने घालवून व प्रसंगविशेषी तिकोट न मिळाल्याने हिरमुसलेले तोंड करून परत तितकी मजल चालत गेलेल्या गृहस्थांच्या गोष्टी मी ऐकलेल्या आहेत. कुलीन स्त्रियांनी हट्ट करून नवऱ्याचे पेटीतून पैसे काढून, गरीबांच्या बायकांनी फणी, करंडे व फण्या गहाण टाकून, व विधवांनी गळचात घातलेली कानकोर्णी विकून, अण्णांचे नाटक पाहण्यास जाण्याकरिता पैसे उत्पन्न केल्याच्या गोष्टी अनेक ऐकिवात आहेत. साधारण पैशाचे कामी ह्यात जड असणाऱ्या गृहस्थांच्याहि या नाटकांचे कामी नाड्या बऱ्याच हलक्या झाल्या; व गरीबांनी एक दिवसाची उपासमार —एक नाटक पाहण्याकरिता अनेक वेळा सोसलेली आहे. परंतु हा सर्व प्रकार केवळ अण्णांचे नवीन टुमीमुळेच झाला होता, असे नाही. तर अण्णांचे मंडळीचे

अंगी गुणच तसा होता. अण्णांचे नाटक पाहण्यास फक्त गृहस्थच जात, असे नाही, तर धंदेवाले प्रसिद्ध गवयीहि जात असत व भावड्या म्हणजे प्रतिगंधर्व आहे असे धन्यवाद त्यांच्या तोंडून निघालेले मी स्वत: ऐकलेले आहेत. नाटकगृहात तर हे धन्यवाद पावलोपावली ऐकण्यास सापडत. उन्हाळ्यात संध्याकाळचे वेळी उकडत असता मध्येच एखादी गार वाऱ्याची झुळुक आली असता किंवा अंगास वाळ्याचे अत्तर चोपडलेला एखादा चैनी गृहस्थ आपल्या जवळून झपकन् गेला असता, आपल्या शरीरास व घ्राणेंद्रियास अनिर्वचनीय सुख होऊन आपल्या तोंडून 'अहाहा !' असा जो एकदम उद्गार निघतो, अशाच तऱ्हेचे उद्गार भाऊरावांची एखादी उत्कृष्ट तान कानी पडताच सर्व प्रेक्षक गणांचे तोंडून निघालेला कोणी ऐकलेला नाही ? आपल्या गावी किर्लोस्करांचे नाटक यावयाचे आहे, असे ऐकताच पंचांगात न सापडणारा असा एखादा नवीन सणच उपस्थित झाला आहे किंवा काय असे लोकास वाटावे. असो, अशा रीतीने किर्लोस्कर मंडळीने महाराष्ट्रातील लोकांस एकाकाळी अगदी वेड लावून सोडलेले होते. अर्थात या काळी संगीत नाटकांबद्दल एकच मत होते, व ते असे की, संगीत नाटक ही फार उत्तम व उपयुक्त संस्था आहे. परंतु क्रमाक्रमाने संगीत नाटक मंडळ्या पुष्कळ झाल्या, व अर्थातच त्यांमध्ये चांगल्यावाईट पात्रांची भेसळ होऊ लागली, व त्यामुळे संगीताची वाईट बाजू लोकांचे नजरेपुढे येऊ लागली. किर्लोस्करांची मंडळी सर्वच मोठी शास्त्रीय पद्धतीने गाणारी होती असे नाही, परंतु त्यांचे कंठ व इतर झोकनोक इतका उत्तम होता की, त्यांचे खाली त्यांचे गाणे शुद्ध की अशुद्ध हे पाहण्यास लोकास सवडच सापडत नसे. शिवाय कोणत्याहि संस्थेचा एकदम उत्कर्ष होण्यास त्यात चांगल्या व्यक्तींचा एकसमयावच्छेदेकरून समावेश व्हावा लागतो. यास उदाहरण न्यू इंग्लिश स्कूलचेच का घ्याना ? न्यू इंग्लिश स्कूल इतके लोकप्रिय झाले त्यास कारण, रा. चिपळूणकर, टिळक, आगरकर, आपटे हे सर्व एकदम एके ठिकाणी जमले हे होय. हेच गृहस्थ पृथक् पृथक् वेळी, व निरनिराळ्या संस्थांत असते तर त्यांचीहि इतकी कीर्ति झाली नसती व न्यू स्कूलचीहि झाली नसती. त्याचप्रमाणे नाटेकर किंवा भाऊराव किंवा मोरोबा ही मंडळी फुटून निरनिराळ्या नाटकमंडळीत असती तरीहि त्यांचे इतके तेज पडले नसते व संगीत नाटक ही संस्था इतकी लोकप्रिय झाली नसती. असो. किर्लोस्करानंतर डोंगरे, ललितकलोत्सव मंडळी, किर्लोस्करानुयायी, पाटणकर, गोवेकर, माणिकप्रसाद, नाट्यकलोत्तेजक वगैरे अनेक मंडळ्या झाल्या, परंतु कदाचित डोंगऱ्यांखेरीज करून या मंडळ्यांमध्ये अण्णा किर्लोस्करांचे योग्यतेचा व बुद्धीचा एकहि सूत्रचालक नव्हता, व भाऊरावांसारखे एकहि पात्र नव्हते. शिवाय कालगतीने अस्सलीची नेहमी नक्कल व प्रतिनकलेमध्ये गुणापेक्षा दोषांची छाया अर्थात अधिकाधिक प्रतिबिंबित होत जाऊन शेवटी मूळ गुणांचे रूप पालटते व तो दोषरूपी होऊन लोकांचे अनादरास

प्राप्त होतो. हीच गोष्ट संगीत नाटकाची झाली आहे. अण्णा किर्लोस्करांनी प्रथमतः रागबाद व संभावित गाण्याचे पद्धतीत थोडासा फरक केला. म्हणजे ख्याल, टप्पा सोडून देऊन किंबहुना ठुंबरीहि सोडून देऊन, निव्वळ पदांवर मजल आणून सोडली व त्यांच्या पात्रास शास्त्रीय शिक्षण चांगले मिळाले नसल्यामुळे शुद्धाशुद्धाची सरमिसळ होऊन व प्राकृत जनास जे विशेष गोड लागेल या पद्धतीचा स्वीकार करून, नवीन संगीताचा पाया रचला. परंतु हा दोष पुढे पुढे फारच विकोपास गेला. खुद्द किर्लोस्करांचे मरणानंतर त्यांचे नावावर चालणाऱ्या मंडळीतहि गाण्याचे कामी अशिक्षितपणा व स्वेच्छाचारप्रियता ही बेसुमार वाढली, व आपल्या सामन्यास टिकण्यास कोणी नाही असे वाटून भाऊराव वगैरे मंडळी-सुद्धा वाटेल तसे गाऊ लागली. याचा प्रत्यय लोकांस येऊन चुकला व १८९८ साली किर्लोस्कर मंडळी पुण्यास असता आजपर्यंत कधी कोणी न ऐकलेली टीका, एका गृहस्थाने केसरी पत्रात पत्रद्वारा उघड करून प्रतिकूल असे लोकमत प्रगट केले. या टीकेचा मंडळीस विषाद वाटला. परंतु पूर्वी आपल्या खऱ्या गुणांचे शक्तीवर जनमनावर जे आपण साम्राज्य केले ते हळूहळू कमी होत चालले आहे, व तसे होणे बरोबर नाही हे भाऊरावादी मंडळीस त्यांचे त्यासच उमजू लागले. परंतु त्यांचे अंगी खिळलेला दोष दुरुस्त होण्यासारखा नव्हता. व अशा रीतीने भाऊरावांचे मृत्यूने खरोखर शेवटचा "संगीत नायक" नाहीसा झाला. त्यांचे मागे बऱ्याच संगीत नाटक मंडळ्या चालू आहेत. परंतु त्यातील पात्रास "संगीत नायक" होण्याची बिलकूल आशा नाही व यास्तव आपल्या अशास्त्रीय व अरसभरित गाण्याने जनरुचि जास्त बिघडवून न टाकण्यापेक्षा ते "मूकनायक"च होतील तर फार बरे. असो.

संगीत नाटकांचे गुणदोष पाहतांना प्रथम ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, त्यातील गाण्यात उत्तम शास्त्रीय पद्धति ठेवता येणार नाही. म्हणजे उत्तम गवयी एक एक चीज एकाच रागात अर्धा अर्धा तासभर सुद्धा गाऊ शकतो, एवढेच नव्हे तर किंबहुना ती तितका वेळ गाइली तरच रागाचे खरे व पूर्ण स्वरूप व तसेच गवयाच्या ज्ञानाचे व गळ्याचे खरे कसब हे व्यक्त करिता येणे शक्य आहे. परंतु संगीत नाटकात असे होणे शक्य नाही. कारण, संगीत नाटक फार तर चार साडेचार तास चालावयाचे, व तेवढ्यात पाच चार पात्रांस मिळून ४०–५० पद्ये म्हणणे भाग पडते. त्याअर्थी गवयाचे पद्धतीने संगीत पात्रास गाणे शक्य नाही, तथापि, कोणाच्याहि पद्यात रागाचे शुद्ध व शास्त्रसिद्ध स्वरूप ठेवणे व पात्राची योग्यता संभाळून गाण्यात जितका प्रौढपणा आणिता येईल तितका आणणे, व ताना घेणे त्या शास्त्रीय नियमास धरून घेणे, इतक्या गोष्टींबद्दलची खबरदारी राखिली असता संगीत हे शास्त्रीय-ज्ञानी गवयासहि प्रिय होईल. वास्तविक गवयी गाण्यातहि क्रमाक्रमाने फेरबदल होत

चालला आहे. म्हणजे पूर्वी गाणे म्हटले म्हणजे धृपद, ख्याल, टप्पा व फार झाले तर ठुंबरी इथपर्यंत त्यांची मजल असे, ती आता गज्जल, पद, चतरंग व लावणी येथपर्यंत मजल आली आहे! तर अशा स्थितीत शास्त्रीय स्वरूप ठेवून व फक्त आलाप कमी करून व वेळ कमी करून जर संगीताची रचना होईल तर फारशी हानी न होता नवीन पद्धतीतील जो चटकदारपणा आहे, तो कायम राहील. परंतु अलिकडे संगीतात जो वाह्यातपणा वाढलेला आहे, तो तर सर्वांशी कमी झालाच पाहिजे. हल्लीचे संगीत म्हणजे सुधारकात मागे एका गमत्या गृहस्थाने वर्णिलेल्या-प्रमाणे कविता 'विटाळचाची' झाली आहे, व सर्व संगीत लावणीपर झाले आहे. प्रस्तुतच्या स्थितीत संगीताबद्दल कोणी तिरस्कार दाखविला तर तो यथायोग्यच आहे, परंतु वर दर्शविलेल्या तत्त्वांवर जर संगीताची सुधारणा होईल तर गायन-कलेची अभिरुचि लोकास उत्पन्न करण्याचे एक मोठेच साधन समाजास मिळालेसे होईल. कारण गवयी लोकांनीहि हे पक्के लक्षात ठेवावे की, त्यांच्या आढ्यतेने व त्यांच्या गर्विष्ठपणाने आजपर्यंत गायन गुरुमुखाच्या कुलुपकिल्लीत अटकावून ठेवले होते ते आता बऱ्याच रीतीने चव्हाठ्यावर आले आहे व ते जर प्राकृत लोकांशी मनमोकळे करून वागतील तर गायनाची फिरून कदाचित भरभराट होईल. गायनकलेचे पूर्वीच्या वैभवाचे दिवस गेले हे खरे आहे. परंतु आपणातली अशी कोणती कला आहे की, तिचे पूर्वीच्या वैभवाचे दिवस गेले नाहीत? प्रस्तुतचा काल म्हणजे पडक्या राजमंदिराचे जोत्यावर चालचलाऊ वाडा बांधण्याचा आहे. गवयी लोकांचा पूर्वीचा राजाश्रय जाऊन त्यास मध्यम व सुशिक्षित लोकांचा आश्रय पत्करणे भाग आहे, व अशा स्थितीत आपल्या जुन्या विद्येस किंचित नवीन स्वरूप देऊन जर लोकप्रिय करण्याचे गवयी लोक नाकारतील तर समाजाची तर हानी आहेच, परंतु त्यांचे व त्यांच्या विद्येचेहि कायमचे नुकसान होणार आहे."

[आजच्या पिढीला बालगंधर्वांची माहिती केवळ ऐकीव खाणाखुणांनी प्राप्त झाली आहे. तीत आत्मप्रत्यय नाही. बालगंधर्वांच्या आधी भाऊराव कोल्हटकर ह्या नटश्रेष्ठाकडे बघण्याची त्यांच्या समकालीनांची दृष्टी कशी होती हे वरील उताऱ्यावरून कळेल. १३ फेब्रुवारी १९०१ ला त्यांचा मृत्यू झाला. 'सयाजी विजय'मध्ये आलेल्या मृत्युलेखाला पुरवणी म्हणून हा लेख देण्यात आला होता. भाऊराव कोल्हटकरांच्या अंतेवासीयाने लिहिलेल्या आणि १९०१ मध्ये छापलेल्या चरित्रातून हा उतारा घेण्यात आला आहे. हा अंतेवासी कोण असेल?—संपादक, युगवाणी]

पुस्तक परीक्षण

मी जिंकलो ! मी हरलो !

[लेखक : विजय तेंडूलकर; मौज प्रकाशन, मुंबई. किं. ३ रु.]

मी जिंकलो ! मी हरलो ह्या नाटकाचा सुंदर प्रयोग मी पाहिला. त्यानंतर नांदेड संमेलनात 'पुलं'नी केलेली लेखकाची स्तुती वाचली व नंतर नाटक वाचले, एकदा, दोनदा, पण समाधान होईना. विजया खोटे, दत्ता भट, श्रीराम लागू ह्या कसलेल्या नटसंचाने सादर केलेला प्रयोग डोळ्यासमोर उभा राही. आपोआप प्रयोगाची व नाटकाची तुलना होऊ लागली. काहीतरी बिनसले होते. खटकत होते. मित्रांबरोबर चर्चा केली, मते मांडल्या गेली. जवळ जवळ सगळे प्रयोगावर खुष होते, नाटकाबद्दल नाराज नव्हते पण मुक्तकंठाने प्रशंसाहि करत नव्हते. कदाचित काही जणांना श्री. तेंडूलकरांवर टीका कशी करावी असा प्रश्न असेल, तर नाटक कोणाच्या डोक्यावरून गेले असेल, तर काही जात्याच अबोल म्हणून चर्चा ऐकीत होते. पण एक गोष्ट निश्चित होती. नाटककाराने जे 'घडविले' त्यांत व 'घडले' त्यात तफावत होती. 'मी जिंकलो ! मी हरलो' अशा मनःस्थितीत माझे मित्र (माझा अपवाद नव्हता त्याला) होते.

मराठी नाट्यरसिकांची व श्री. तेंडलकरांची प्रशस्ति करतांना नांदेड संमेलनांत 'पुलं' म्हणाले "तेंडूलकरांची सुंदर नाटके आनंदाने पाहणारा आजचा समाज हा अगदी दुधखुळ्यांचा आहे असे समजण्याचे कारण नाही." नंतर ते म्हणाले. "कै. वर्तक, रांगणेकर, आणि त्यानंतरचा विजय तेंडूलकर किंवा (?) वसंत कानेटकर ह्यासारख्या नव्या नाटककारांनी जर माझ्या मते सर्वात मोठी भर कोणती घातली असेल तर ठोकळेबाज स्वभावचित्रणाबाहेर जाण्याची धडपड केली ही होय. नाटकाला हीरो, हिरॉईन आणि व्हिलन ह्या त्रिकोणाबाहेर खेचले. केवळ काळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या ढोबळ खटक्यातून हे नाटककार बाहेर पडून मनुष्यस्वभावाच्या विविध छटा दाखविण्याचा जो प्रयत्न करीत आहेत त्याने नाटककलेचे पाऊल निश्चितच पुढे पडत आहे असे वाटते." अशा तऱ्हेने नाटककलेचे पाऊल पुढे पडण्याला मदत करणाऱ्यांच्या जंत्रीतील श्री. तेंडूलकराच्या नाट्यप्रयोगाने जरी प्रेक्षकांचे मन जिंकले तरी वाचकांना मात्र 'मी हरलो'चा प्रत्यय का आला हे पहाणे जरूर आहे

नाटककाराने नाटकाला 'मी जिंकलो! मी हरलो' असे नाव का दिले असावे? माधवच्या दोलायमान स्थितीचे वर्णन करण्यासाठी? पुस्तकाच्या मुखपृष्ठावर 'नाक नसलेले, पण सारख्या भिवयांचे, डोळ्यांचे, जिवणीचे दोन मुखवटे (त्यातील एक अश्रू गाळणारा) छापण्यास का मान्यता दिली?'

"पेशा नोकरीचा व छंद नाटकाचा" असलेला एक कारकून नोकरी सोडून नाटकात व नंतर सिनेमात काम करतो. कोण्या एका कलाकाराच्या जीवनातील संघर्ष, स्थित्यंतरे हा नाटकाचा विषय. त्याची तीन भागात विभागणी केलेली आहे. पहिला भाग नोकरीत बढती मिळावी म्हणून दासगुप्तांना भेटावे किंवा नाही ह्या चर्चेचा, दुसरा आर्थिक विवंचनेचा व तिसरा सिनेमात पैसे मिळवून नंतर चांगली नाटके व प्रयोग करण्यासाठी नाटयसंस्था चालविण्याचा.

पहिल्या अंकात बऱ्याच वादाळानंतर जरी माधव दासगुप्ताकडे जाण्यास तयार होतो तरी "आता संभाळ ग पोरी" असा इशारा वाचक प्रेक्षकांना देऊन अंक संपतो. दुसऱ्या अंकाची अखेर "प्रयोगासाठी जाण्याची तयारी करत असतानाच "ती नाही जात नाटकाला, तुझी शप्पथ नाही" ह्या वाक्याने होते. तिसऱ्या अंकात थकलेला, चिडलेला माधव पैशासाठी कला विकणार नाही असा निर्धार करून, आर्थिक स्थैर्य आल्यावर चांगली नाटके सादर करणारी संस्था काढता यावी म्हणून स्वतःला न पटणारी कामे करण्यास, समारंभात भाग घेण्यासाठी तयार होतो. आचार व विचाराचा परस्पर विरोध हेच सूत्र तिन्ही अंकाच्या अखेरीस वापरल्यामुळे वाचकाला तोचतोपणा जाणवतो. पण ह्याच आचारविचारांच्या विरोधातून नाटकाचे नामाभिधान झाले असावे. खोलवर विचार केला तर आर्थिक स्थैर्य आजच्या समाजात जवळजवळ अशक्य आहे. असे आर्थिक स्थैर्य प्राप्त झाल्यावर उत्तम नाटके सादर करणारी संस्था काढण्याचा विचार, त्यामागचा आशावाद मृगजलासारखा आहे, अशक्य कोटीतला आहे. पण तो आशावाद उराशी बाळगल्यामुळेच जर नाटककाराला माधवाची "मी जिंकलो" ही अवस्था दिसत असेल तर खऱ्या अर्थाने तो हरल्यासारखाच आहे. आणि म्हणूनच नाटकाच्या नावातील "मी जिंकलो" हा भाग सार्थ वाटत नाही, लंगडा वाटतो.

प्रयोगात व प्रकाशनावृत्तीत जाणवणारी दुसरी गोष्ट, नाटकाला नसलेला तोल. मनुष्यस्वभावाच्या विविध छटा दाखविण्यात वाकबगार असलेले तेंडूलकर दादांचे जसे प्रभावी चित्रण करू शकले जसे माधवचे करू शकले नाहीत. कलाकारात व फकिरात एका बाबतीत फारसा फरक नसतो. दोघांनाही 'घर' असून नसल्यासारखे असते. कधी कधी नसतेच. अशा परिस्थितीत माधवला ज्या प्रसंगांना तोंड द्यावे लागते त्या संघर्षाचे रूप बहुतांशी घरगुती रंगविल्यामुळे संघर्षात खोली जाणवत नाही. त्याचे दुसरे कारण माधवाने केलेली तात्त्विक

तडजोड हे होय. ह्याला अपवाद, 'हुंदक्यांचे जंगल' व "कलेला बाजारू रूप येऊ नये म्हणून पडद्याच्या ठिगळांत आत्मा शिवून टाकणे" ह्या कल्पना. कलाकाराला भेडसावत असलेल्या संघर्षाचा दुसरा भाग कै. नाना जोगांच्या 'चित्रशाळा' नाटकात वाचण्यास मिळतो. त्यांच्या नाटकातला प्रकाश संपन्नावस्थेतून विपन्नावस्थेत जाण्याची तयारी करून निघून जातो व तसे करताना जे मनोधैर्य दाखवितो, कलेला बाजारू रूप येऊ नये म्हणून ज्या संघर्षास तोंड देण्यास तयार होतो त्यामुळे संघर्षाचे रूप जसे मनोवेधक होते, तसे श्री. तेंडूलकरांच्या नाटकात होत नाही.

माधवचे पात्र मनाची पकड घेण्यास असमर्थ होण्याचे दुसरे कारण असेहि आहे की पहिल्या अंकात ज्या प्रकारच्या अभिनयामुळे माधवला आत्मविश्वास वाटतो त्या भूमिकेत व सिनेमातील ज्या भूमिकेची माधवला तिसऱ्या अंकात चीड येते त्यांत कोणताच फरक नाही. दोन्ही भूमिका सारख्या धर्तीच्या, प्रेक्षकांना हसविणाऱ्या. फरक एवढाच की पहिली भूमिका नाटकातील व दुसरी सिनेमातील. ठराविक ठशाच्या भूमिका सारख्या केल्याने देखील कलाकाराला कंटाळा येऊ शकतो, चीड येऊ शकते, प्रसंगी, वैराग्यावस्था येऊ शकते, येणे स्वाभाविक आहे. ह्या प्रकारच्या विरोधाला नाटकांत स्थान नाही. चांगली नाटके सादर करण्यासाठी कल्पिलेले आर्थिक स्थैर्य घेण्यासाठी कलेच्या बाजाराला मान्यता द्यावी लागणार, आत्मा ठिगळाप्रमाणे शिवून टाकावा लागणार, ह्यामुळे चीड न येता सिनेमात न पटणारी कामे करण्याची जी तात्त्विक तडजोड माधव स्वीकारतो त्यामुळे अंतस्थ संघर्षाची खोली कमी होते. तसेच दादांचे स्वभाव विशेष असलेल्या मधूच्या पात्राने संवादांना खुमारी येत नाही. उलट नाटकाला गति न देणाऱ्या संवादांची भर पडते व त्याच प्रमाणात स्वभाववैचित्र्यामुळे, नाटकाला जी रंगत येऊ शकते त्याला बाधा निर्माण होते.

हीरो, हिरॉईन व व्हिलन ह्या त्रिकोण टाळण्यात जरी नाटककार यशस्वी झाला असला तरी केवळ त्यामुळेच कलाकाराची व्यथा, मानसिक संघर्ष दाखविणारी जी थोडी नाटके मराठी नाट्यसृष्टीत आहेत त्यात मोलाची भर घातल्याचे श्रेय श्री. तेंडूलकरांना देणे धारिष्टयाचे होणार आहे.

—आनंद जोग

रूपमती——कवि–रा. अ. काळेले, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे. किंमत २ रुपये ५० नये पैसे. पृष्ठसंख्या ९८ प्रस्तावना–वि. स. खांडेकर

जवळ जवळ गेली साडेतीन तपे कविवर रामचंद्र अनंत काळेले यांचे कवितालेखन अखंड चालू आहे. त्यांच्या वाग्गंगेला खळ कसा तो माहीत नाही.

अनुक्रमणिका

परंतु ही वाग्गंगा पावसाळ्यागणिक आपला प्रवाह बदलीत असते. गेल्या चाळीस वर्षांत मराठी कवितेच्या बाह्य आणि आंतर स्वरूपात जी जी परिवर्तने अथवा परिवर्धने झाली, त्या सर्वांचे ठसे काळेल्यांच्या रचनेत उमटले आहेत हे त्यांचे आजपर्यंतचे निरनिराळे कवितासंग्रह नजरेखालून घातल्यास कुणाच्याहि लक्षात येईल. त्यांची प्रतिभा काळाबरोबर पावले टाकणारी आहे. ती मागे रेंगाळत राहात नाही.

'रूपमती'त त्यांच्या एकूण पंचेचाळीस कविता संगृहित करण्यात आल्या आहेत. त्यात प्रेमानुभूति आणि प्राकृतिक प्रीति हे दोन प्रवाह प्रमुख आहेत. ऐन तारुण्यात काळेल्यांनी अनेक उत्कट भावगीते आलापिली आहेत. त्यांच्या रतिभावनेत ती उत्कटता आजहि कायम आहे. पूर्वी ती केवळ उत्कटच होती. पण आता वाढत्या वयामुळे व जीवनातील विविध अनुभवामुळे ती विशेष प्रगल्भ, प्रगाढ व प्रशांत झाली आहे. ही रतिभावना पुष्कळ वेळा निसर्गाच्या अवगुंठनातून दृष्टिक्षेप करीत असल्यामुळे अधिकच रमणीय व विलोभनीय झाली आहे. मानवी मनातील स्वाभाविक रति आणि जादुटोणा करणाऱ्या प्रकृतीच्या सहज रम्य रूपातील दीप्ति यांचा आपल्या कवितेत हृदयंगम संगम साधण्यात काळेले अतिशय कुशल आहेत. 'वाट तूझी पैंजणाची', 'इंदुमुखी रमणरात', 'आज पुन्हा' या त्यांच्या प्राकृतिक शृंगारगीतांत त्यांची ही कुशलता दृष्टीस पडते. 'आज पुन्हा'त ते उद्गारतात—

'आज पुन्हा आपण बसलों जवळीं । तशिच पुन्हा दिल्खुलास तूं हसली !
मन–मोगर शुभ्र कळचा फुललेल्या । पिउनि तुझे संग–मधुर मधु वारे
आज पुन्हा तू तरुणी···मीहि तरुण···। मज लवऱ्या फांदीचा मोह अजुन,
मोह तुझ्या या उघड्या खांद्यांचा । विरधळले ज्यावर कच–वंधारे···'

'रूपमती'त शृंगारिक प्रीतिगीतांपेक्षा प्राकृतिक प्रीतिगीतांचे प्रमाण अधिक आहे. विंध्याद्री आणि सप्तशृंग यांच्या कुशीत झोपलेला व नर्मदा आणि चंबळ यांच्या पदराआड लपलेला मालव प्रदेश हा आपल्या अनुपमेय सृष्टिसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. काळेल्यांचे जीवन त्याच प्रदेशात व्यतीत झाले आहे. त्या प्रदेशातील सौंदर्य त्यांच्या डोळ्यात भरले आहे आणि अंतःकरणात शिरले आहे. त्यांचे हे प्रकृतिप्रेम त्यांच्या बहुतेक कवितात ह्या ना त्या रूपाने प्रतिबिंबित झाले आहे. 'रूपमती'तील 'चिंच', 'नदी', 'श्रावण', 'एक ढग' इत्यादि कवितांत त्यांनी निसर्गाला सजीव व साकार केले आहे. 'नदी'ला उद्देशून ते म्हणतात—

'नदी, नदी ! तूं कधि वळणारी । दूर कधी पळणारी, ग...
पहिल्या वळणावर मिळणारी । प्रीत तुझी कळणारी, ग...

तूं माशा (झ्या ?) स्तव तळमळणारी । स्पर्शाला हलणारी, ग...
काठावरती घागर घागर । भरणारी तूं नारी, ग...
'मी',

'दोनमने,' 'ऊब' यांसारख्या कवितांत काळेले स्वतःच्या अन्तर्मनाचे पापुे हळुवार हाताने उलगडताना दिसतात. त्यांच्या श्रृंगारिक गीतांत व प्राकृतिक कवितांत कल्पनांचे प्रदर्शन आहे. परंतु या चिंतनपर कवितांत जीवनाचे दर्शन आहे.' मी मध्ये ते स्वतःच स्वतःला विचारतात.—

"खुल्या शांत रानामधे नांदतो मी । तुफानात लाटांसवे भांडतो मी
परी मी खुळा हो खुळा, आपल्याशी । न भांडू शके आणि नांदू शके ना !

असे का, हे कोडे मात्र त्यांना उलगडत नाही. या कवितात काळेल्यांची प्रतिभा अज्ञाताच्या क्षितिजापर्यंत जाऊन पोचते. परंतु तेथेच टक्कर खाते आणि ज्ञाताकडे पुन्हा माघारी वळते. कारण काळेले कवि आहेत, दार्शनिक नाहीत.

काळेल्यांच्या रचनेतील शब्दशय्या कोमलकांत आहे. कवितेतील शब्दांची गुंफण भावानुगामी करण्यात ते सिद्धहस्त आहेत. त्यांच्या शब्दशैलीत जात्याच गति व लय यांचा संचार आहे. त्यामुळे त्यांची कविता गोड गळ्यावर म्हणता येते, ती शुष्क, रुक्ष अथवा नीरस वाटत नाही.

काळेल्यांनी प्रतिभा जिवंत व जागृत आहे, 'रूपमती' प्रमाणेच ते यापुढे नवेनवे कवितासंग्रह रसिकांस सादर करतील अशी अपेक्षा आहे.

—भवानीशंकर पंडित

मराठी का आधुनिक साहित्य—ले. प्रो. गो. भी. देशपांडे, एम्. ए.,बी. टी., आधुनिक भारतीय भाषा-विभाग, काशी हिंदू विश्व-विद्यालय, वाराणसी; प्रकाशक : नवयुग बुक स्टॉल, अमरावती; मूल्य १२ रु. ५० पै.

आधुनिक मराठी साहित्याच्या स्वरूपाची धावती समालोचनात्मक ओळख हिंदी भाषिकांना करून देण्याच्या उद्देशाने प्रा. देशपांड्यांनी हा सुमारे सहाशे पानांचा प्रपंच केला आहे. आधुनिक मराठी साहित्य मूलतः इंग्रजी अमदानीत, इंग्रजी साहित्याशी आमचा परिचय घडून आला त्या काळातच निर्माण झाले आहे, ह्या इंग्रजी साहित्याच्या परिचयामुळे आणि पुष्कळ अंशी त्याच्या प्रभावामुळेच त्याचे विद्यमान स्वरूप निश्चित झालेले आहे. ही घटना जशी मराठीच्या बाबतीत, तशीच इतर भारतीय भाषांच्या आणि त्यातील साहित्याच्या बाबतीतहि

घडली. त्यामुळे वाङ्मयाचे प्रवाह ह्या देशातील सर्वच भाषा-साहित्यात बरेचसे एकाच ठशाचे असणे अपरिहार्य झाले. पण तसे असले तरी, मराठी साहित्याची काही वैशिष्ट्ये निश्चितपणे अस्सल मराठी धाटा-वाटाची आहेत आणि त्यांनी मराठी साहित्याला इतर भारतीय भाषा-साहित्यापेक्षा काहीसे निराळे स्वरूप प्राप्त करून दिलेले आहे, हेहि काही खोटे नाही. गेल्या दीडशे वर्षात ज्या श्रेष्ठ विचारकांनी पराकोटीचे प्रयत्न करूनहि मराठी साहित्यांची वेल जोपासली, बहाराला आणली त्यांचा उल्लेख त्यांच्या साहित्य-कृतींच्या मार्मिक रस-ग्रहणासह प्रस्तुत ग्रंथात लेखकाने साक्षेपाने वाचकांपुढे ठेवला आहे. आधुनिक मराठी साहित्याच्या गतिशीलतेचे स्वरूप त्याच्या वाचनाने निःसंशयपणे लक्षात येईल. राष्ट्रीय भावना जोपासण्याच्या कामी सहाय्यक होणारा एक दुवा सांधण्याचे काम प्रा. देशपांड्यांनी ह्या पुस्तकाद्वारे केले. ह्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे.

—शं. वा. शा.

अनुक्रमणिका

‘ युगवाणी ’कडे अभिप्रायार्थ आलेल्या पुस्तकांची साभार पोच

जून-जुलै १९६५

१ वसंत बहार	लेखक : डॉ. वसंत सांगळे, गिरीश प्रकाशन, धुळे; कि. रु. २–५०
२ शुकदेव चरित्र	संपादक—डॉ. यू. म. पठाण; मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद; कि. रु. १–००
३ ही असली बायको मला नको	लेखक : वि. ज्ञा. निनावे; प्रकाशक : सौ. लीला निनावे, c/o श्री. वि. ज्ञा. निनावे, मु. पो. नांदगाव खांडे-श्वर, (ता. जि. अमरावती) कि. रु. १–५०
४ वाजली विजेची टाळी	लेखक : वि. रा. कांत मौज प्रकाशन, मुंबई ४, कि. रु. ५–००
५ मिटलेले आकाश	लेखक : श्रीमती लक्ष्मीबाई कुळकर्णी मौज प्रकाशन, मुंबई–४; कि. रु. ६–००
६ यशोदा	लेखक : श्री. ना. पेंडसे मौज प्रकाशन, मुंबई; कि. रु. ३–००
७ चंबळची दस्युभूमी	लेखक गीता साने मौज प्रकाशन, मुंबई; कि. रु. १५-००
८ अधांतर	लेखक : विजया राजाध्यक्ष मौज प्रकाशन, मुंबई; कि. रु. ७–५०
९ वनफुलं	लेखक : म. म. देशपांडे मौज प्रकाशन, मुंबई,; कि. रु. ४–५०
१० शल्यपर्व [नवरस नारायण विरचित]	लेखक : डॉ. यू. म. पठाण मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद; कि. रु. ६–००

संपादकीय

युगवाणीच्या नवीन संपादक मंडळाने सादर केलेला 'युगवाणी'चा हा तिसरा अंक! ह्या तिसऱ्या अंकात एका तरुण प्रथितयश कथा-काराचा परिचय करून देण्यात आला आहे. परिचय करून देणारे सुद्धा कसलेले परिचायक आहेत, हे लेख वाचताच पटेल. पहिल्या अंकात नाटककार, दुसऱ्यात कवी, तिसऱ्यात कथाकार असा हा क्रम आला आहे.

युगवाणीत वैदर्भीय लेखकांचे प्रतिबिंब दिसावे ह्यासाठी 'युगवाणी' प्रयत्नशील आहे. वैदर्भीय लेखकांशी जवळीक साधण्याचा 'युगवाणी'चा प्रयत्न यशस्वी होणं न होणं हे अर्थात वैदर्भीय साहित्यिक, कवी आणि कलावंत ह्यांचा 'युगवाणी'संबंधी जिव्हाळा संपादन करण्यात 'युगवाणी' कितपत यशस्वी होईल ह्यावर निर्भर आहे. सामान्य वाचक 'युगवाणी' उघडून वाचू लागला आहे म्हणतात. थोडक्यात आमचा प्रवास सुरू झाला आहे. अपेक्षा मोठी आहे. प्रयत्न थिटे आहेत.

> There's nothing here for pride or show.
> The roof is high, the house is low.

वरील मजकूर लिहीत असताना श्री. चिमोटे ह्यांना आलेले श्री. केशवराव दाते ह्यांचे पत्र वाचावयास मिळाले. त्यातील काही भाग येथे उद्धृत करीत आहे; कारण स्पष्ट आहे.

"गेल्या दोन तीन महिन्यात आपल्या वि. सा. सं. चे मुखपत्र 'युगवाणी' ह्याचे दोन अंक मजकडे आले. आपल्या भागातील वाङ्मयीन चळवळी व व्यक्ती यांचे विषयी इकडच्या भागात क्वचितच काही वाचावयास मिळते. जुलैच्या अंकाचे अंतरंग फार चांगले आहे. श्री. यादवराव पाठक यांच्यासारख्यांची मला तर माहिती नव्हतीच पण इकडेहि अलिकडील पिढीत ते कोणाला फारसे माहीत असतील असे वाटत नाही. भवभूतीवरील टिपणीहि फार छान आहे. युगवाणीसारखी

मासिके चालविणे हा नेहमीच नुकसानीचा व्यवहार असतो, हे इकडेहि कैक वर्षांपासून सिद्ध झाले आहे. पण कोणी तरी हा व्यवहार खिशाला खार लावून करावाच लागतो. व त्याकरिता साहित्य संघासारख्या संस्थांनीच हा भार उचलावा लागतो."

हे पत्र उद्‌धृत करण्याचा मोह मला टाळता आला नाही. अनुमतीशिवाय हे छापण्यास दिल्याबद्दल श्री. दाते आणि श्री. चिमोटे ह्यांची मी क्षमा मागतो.

विदर्भ साहित्य संघ खऱ्याखुऱ्या अर्थाने विदर्भातील साहित्यिकांची बैठक होण्याच्या दृष्टीने साहित्यगोष्ठींसाठी नियमितपणे शक्य असेल त्या साहित्यिकांनी नियतकालिक बैठकींना यावे अशी काहीतरी योजना असावयास हवी, असे वाटल्यावरून दर महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या बुधवारी सायंकाळी ६॥ ते ८ साहित्यिक गोष्टींचा कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरविले आहे. या कार्यक्रमात आपापल्या साहित्यकृती (कथा, कविता, लघुनिबंध, लेख इत्यादी) लेखकांनी सादर कराव्या. व शक्य झाल्यास त्यांवर चर्चा व्हावी, अशी अपेक्षा आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी निदान नागपुरवासी साहित्यिकांनी प्रत्येक पाक्षिक कार्यक्रमास उपस्थित राहून व साहित्यगोष्ठीत आपले साहित्य सादर करून सहभागी व्हावे अशी विनंती आहे. विदर्भातील जे साहित्यिक या पाक्षिक कार्यक्रमांच्या दिवशी नागपूरमध्ये असतील त्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचा प्रयत्न करावा. ज्यांना आपले साहित्य सादर करावयाचे असेल (या कार्यक्रमात) त्यांनी साधारणपणे कार्य-क्रमापूर्वी एक आठवडा तशी सूचना द्यावी. हे कार्यक्रम विदर्भ साहित्य संघाच्या गडकरी भवनात आयोजण्यात येतील. या उपक्रमामुळेहि 'युगवाणी' खऱ्या अर्थाने विदर्भातील साहित्यिकांचे मुखपत्र होईल अशी अपेक्षा करू या. युगवाणीच्या संपादकवर्गापैकी श्री. श्रीकांत राय ह्यांच्याशी ह्या बाबतीत संपर्क साधावा.

अनुक्रमणिका

मराठी साहित्य महामंडळाच्या द्वारा भरणारे

मराठी साहित्य संमेलन

४६ वे अधिवेशन (हैद्राबाद द.)

अध्यक्षपदासाठी नावे सुचविण्याबद्दल जाहीर सूचना

१. निवडावयाचा संमेलनाध्यक्ष हा महामंडळाच्या घटक, समाविष्ट अथवा संलग्न संस्थेचा सदस्य असला पाहिजे. (आज १. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, २. विदर्भ साहित्य संघ, नागपूर, ३. मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, ४. मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई या चार घटक संस्था आणि १. मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ व २. मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश या दोन समाविष्ट संस्था मिळून सहा संस्था महामंडळामध्ये अंतर्भूत आहेत.)

२. महामंडळाच्या अंतर्भूत संस्थेच्या सदस्याला आपल्या संस्थेच्या क्षेत्रातील सदस्याचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविता येईल. ज्याचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविण्यात येईल त्याची अनुमती व महामंडळाच्या कोणत्यातरी अंतर्भूत संस्थेचा सदस्य असल्याबद्दलचे त्याचे प्रतिज्ञापत्रक सोवत भरून आले पाहिजे व सूचक—अनुमोदकांनी हे पत्रक ठराविक मुदतीत, १५ ऑगस्ट १९६५ पूर्वी पोचेल अशा बेताने आपल्या संस्थांच्या कार्यावाहाकडे पाठविले पाहिजे. यासाठी ठराविक नमुना-पत्रक अंतर्भूत संस्थांच्या कार्यालयाकडून मिळू शकेल.

तरी वरील सहाही संस्थांच्या सदस्यांना जाहीर विनंती आहे की, त्यांनी वरील पत्रकातील सूचनांस अनुसरून हैद्राबाद संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी सुचवावयाची नावे आपल्या संस्थांच्या कार्यालयाकडे पाठवावी.

पत्रव्यवहाराचा पत्ता—कार्यवाह, मराठी साहित्य महामंडळ, द्वारा–विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

प्र. वा. ऊर्ध्वरेषे
कार्यवाह
मराठी साहित्य महामंडळ

दत्तो वामन पोतदार
अध्यक्ष
मराठी साहित्य महामंडळ

अनुक्रमणिका

ता. क.— महामंडळाने ठरविलेल्या संमेलनविषयक नियमानुसार संमेलनाध्यक्षाची निवडणूक पुढीलप्रमाणे होईल.

वरील पत्रकात नमूद केल्याप्रमाणे अंतर्भूत संस्थांच्या सदस्यांनी आपापल्या संस्थेकडे सुचविलेल्या नावातून त्या संस्थेचे कार्यकारी मंडळ तीन नावे निवडून ती महामंडळाकडे पाठवील. अशा प्रकारे सर्व अंतर्भूत संस्थांच्या कार्यकारी मंडळाकडून आलेल्या नावातून महामंडळ तीन नावांची निवड करील. सर्व अंतर्भूत संस्थांच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य हे या निवडणुकीसाठी मतदार राहतील व ते क्रमसार पद्धतीने (सिंगल ट्रान्सफरेबल व्होट पद्धतीने) गुप्त मतदान करून अध्यक्षाची निवड करतील.

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ यांजकडून

परीक्षा समितीवृत्त—

केंद्राधिकाऱ्यांना सूचना व विनंती

(१) सप्टेंबर सत्राची परीक्षा शनिवार दिनांक ११ आणि रविवार दिनांक १२ सप्टेंबरला घेण्यात येईल.

(२) नवीन केंद्र सुरू करण्यासाठी कमीतकमी २० विद्यार्थी परिक्षेस बसविले तरच केंद्र-मान्यता देण्यात येईल, असा समितीचा परिपाठ आहे. परिक्षार्थी आवेदन पत्र मूल्य २५ पैसे प्रमाणे केंद्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. आवेदन-पत्र-मूल्य आणि केंद्र पुरस्कार याचा सामान्यत: विनियोग टपालखर्च, प्रमाण-पत्र विवरण व परितोषक वितरण यासाठी करावा. केवळ परीक्षार्थ्यांचे निर्धारित शुल्कच केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

(३) आपल्या केंद्रातून दि. १० ऑगस्टपर्यंत परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन, केंद्रीय कार्यालयाकडे दि. २० चे आत पाठविण्याची दखल घ्यावी. तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाहीत. केंद्राकडून शक्य तितक्या लवकर किती विद्यार्थी परीक्षेस बसू शकतील याचा अंदाज कार्यालयास कळवावा.

आगामी सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून सहकार्य द्यावे.

दिनांक १-८-६५
वि. सा. संघ, नागपूर

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

१९६४–१९६५ चे कार्यवृत्त

एक एप्रिल १९६४ पासून सुरू झालेल्या नवीन वर्षात कार्यकारी मंडळाच्या नऊ आणि सर्वसाधारण सभासदांच्या दोन सभा झाल्या.

या वर्षी सभासद नोंदणी अमाप उत्साहात होऊन एकूण ४३८६ सदस्य पटावर नोंदले गेले. त्यात २४० आजीव, ४ उपकर्ते, ६ आश्रयदाते, २ सहाय्यक, ५ हितचिंतक आणि ४१२९ सर्वसाधारण सभासद होते.

वेगवेगळ्या समित्यांनी संबंधित वर्षातील कार्यक्रम व्यवस्थित पार पाडल्या-बद्दल त्या त्या समित्या आणि त्यातील कार्यकर्ते यांना मनःपूर्वक धन्यवाद.

सांस्कृतिक कार्यक्रम समितीद्वारे श्रीगणेशव्याख्यानमाला, कै. ना. के. वेहेरे व्याख्यानमाला, महाकवी कालिदासस्मृतिदिन, व्यासपौर्णिमा, लोकमान्य टिळक जयन्ती, कविवर्य ना. मु. गुप्ते उर्फ 'बी' कवी पुण्यतिथी, श्रीशारदोत्सव, कवी कै. अण्णाजी त्रोबडे स्मृतिदिन, कै. अ. व. कोल्हटकर स्मृतिदिन आणि संघाचा ४२ वा वर्धापन दिन हे कार्यक्रम नियोजित करण्यात येऊन त्यात ह. भ. प. निजामपूरकर महाराज, न्या. मू. वि. अ. नाईक, श्री. श्री. भि. वेलणकर, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. श्री. भा. वर्णेकर, प्राचार्य या. मु. पाठक, श्री. दादा-साहेब आपटे, म. म. बाळशास्त्री हरदास, डॉ. शं. दा. पेंडसे आदी नामवंत वक्ते, साहित्यिक आणि विद्वानांची व्याख्याने झाली.

नाट्यसमिती तर्फे कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर स्मृतिदिन, कै. वीर वामनराव जोशी पुण्यतिथी, नाट्याचार्य कै. खाडिलकर स्मृतिदिन, नटसम्राट कै. गणपतराव जोशी स्मृतिदिन हे नैमित्तिक कार्यक्रम घेण्यात आले. शिवाय, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध रंगभूषातज्ज्ञ श्री. नाना जोगळेकर यांचे एक व्याख्यान प्रात्यक्षिकासहित आयोजित करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे 'श्री. खोलकुटे ढाल' स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्थानिक पाच महाविद्यालयांनी ह्या स्पर्धेत भाग घेतला. या वर्षीचे विजेते विश्वेश्वरय्या इंजिनिअरिंग कॉलेज, नागपूर यांच्या 'चोरावर मोर' या नाट्यप्रयोगाला ढाल देण्यात आली. याच नाटकातील श्री. नांदे आणि कु. तांबे यांना अभिनयाबद्दल प्रथम पारितोषिक मिळाले.

अनुक्रमणिका

नाटचसमितीने साजऱ्या केलेल्या बाल नाटचमहोत्सवात नऊ स्पर्धक संस्थांनी भाग घेतला. नव्याने आयोजित 'बाल नाटचलेखन स्पर्धे'तही एकूण बारा लेखकांनी भाग घेतला. श्री. चं. ना. देशपांडे, पुणे, श्री. मधुसूदन वेलणकर, नागपूर यांनी 'स्वराज्याचे कंकण' आणि 'धनाजी जाधव व संताजी घोरपडे' या नाटचकृतीबद्दल अनुक्रमे पहिला आणि दुसरा क्रमांक मिळविला.

न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धेत विदर्भातील २२ महाविद्यालयांनी भाग घेतला. फिरती रौप्यढाल सी. पी. अँड बेरार एज्युकेशन सोसायटीचे महाविद्यालय, नागपूर, ने मिळविली. व्यक्तिगत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक वरील महाविद्यालयाचे श्री. एस्. एन्. देशपांडे आणि द्वितीय क्रमांकाचे विश्वेश्वरय्या इंजिनियरिंग कॉलेज, नागपूरचे श्री. पां. उ. देशपांडे यांना देण्यात आले. याशिवाय, साठ टक्के गुण मिळविल्याबद्दल श्री राजस्थान आर्यन महाविद्यालय, वाशीमचे श्री. एस्. के. जाधव यांना खास प्रमाणपत्र देण्यात आले.

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिती, पुणे या संस्थेतर्फे विदर्भ साहित्य-संघाच्या स्वाधीन केलेल्या निधीच्या रकमेवरील व्याजातून महाराष्ट्रातील विद्यापीठांतून बी. ए. परीक्षेत मराठी ऐच्छिक विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येकी रु. १००.०० ची रोख पारितोषिके १९६४–६५ मध्ये देण्यात आली. श्री. एस्. एन्. ढवळे, नागपूर विद्यापीठ, कु. नि. धों. मिरजकर, पुणे विद्यापीठ, कु. नदा मारोतराव आपटे, मुंबई विद्यापीठ आणि श्री. मा. द. मोरे, मराठवाडा विद्यापीठ यांना ही पारितोषिके दिल्याचे जाहीर करण्यात आले.

गडकरी स्मारक समितीने सालाबादप्रमाणे कै. गडकऱ्यांचा ४६ वा स्मृतिदिन साजरा केला. प्रा. म. ना. लोही यांनी "गडकऱ्यांची प्रेरणा आणि प्रतिभा" या विषयावर प्रबंध वाचला. श्री. शरद सुतवणे यांनी कै. गडकरी यांच्या निवडक कवितांचे गायन केले.

परीक्षा समिती तर्फे याच वर्षी प्रीयुनिव्हर्सिटी समकक्ष 'साहित्य प्रबोध' परीक्षा सुरू करण्यात आली. सप्टेंबर १९६४ मध्ये एकूण ७२४ परीक्षार्थी [प्रवेश ७७, प्रारंभ १०७, विनीत ४०३, परिचित १९, प्रबोध ६२, स्नातक ५३ आणि पारंगत ३.] व जानेवारी ६५ मध्ये एकूण १२०७ [प्रवेश १४४, प्रारंभ १६९, विनीत ३७९, परिचित ९४, प्रबोध २४३, स्नातक १७३ आणि पारंगत ५] अनुक्रमे ३० आणि ४३ केंद्रातून परीक्षेला बसले.

धनवटे रंगमंदिरात या वर्षी ५३ मराठी नाटके, हिंदी किंवा इतर भाषेतील १३ नाटके, व इतर कार्यक्रम झाले.

अनुक्रमणिका

श्री. र. द. सरंजामे, ॲडव्होकेट, नागपूर, यांच्या "स्मृतिवैचित्र्य" या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आणि कै. आ. कृ. टेकाडे यांच्या छायाचित्राचा अनावरण समारंभ झाला.

संघाचे पूर्वाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते यांची नागपूर महाविद्यालयातून विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे बदली झाल्याबद्दल त्यांना लो. ना. डॉ. बापूजी अणे यांचे अध्यक्षतेखाली संघातर्फे निरोप देण्यात आला. त्याचप्रमाणे सरचिटणीस, प्रा. श्री. गो. काशीकर यांची अमरावतीला बढतीच्या जागेवर बदली झाल्याबद्दल त्यांना निरोप देण्यात आला.

या वर्षी विदर्भ साहित्य संघाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, माननीय श्री. वसंतराव नाईक, गृहमंत्री, माननीय श्री. बाळासाहेब देसाई, महाराष्ट्रकवी श्री. यशवंत पेंढरकर, मराठी साहित्य महामंडळाचे त्या वेळचे चिटणीस आणि प्रसिद्ध पत्रकार श्री. श्री. शं. नवरे, श्री. वि. स. खांडेकर, प्रसिद्ध पत्रकार श्री. बाबासाहेब घोरपडे, सदस्य विधान परिषद, महाराष्ट्र राज्याच्या ॲडमिनिस्ट्रेशन डिपार्टमेंटचे अंडर सेक्रेटरी श्री. आर. पी. उमरजी, डॉ. ह. रा. दिवेकर, उज्जैन इत्यादी मान्यवर नेत्यांनी, साहित्यिकांनी आणि प्रसिद्ध व्यक्तींनी भेट देऊन संघाच्या कार्याची प्रशंसा केली.

विदर्भ साहित्य संघाचे विश्वस्त लो. ना. डॉ. मा. श्री. उपास्य बापूजी अणे यांचा ८५ व्या आणि संघाचे संस्थापक कविभूषण प्रा. ब. ग. उर्फ अण्णासाहेब खापर्डे यांचा ७५ व्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

पंडित जवाहरलाल नेहरू, श्रीमंत दादासाहेब धनवटे आणि कविवर्य आ. कृ. टेकाडे यांच्या निधनाबद्दल दुखवटयाच्या सभा घेण्यात आल्या आणि अनेक व्यक्त्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. मा. गो. देशमुख यांनी लो. ना. डॉ. बापूजी अणे यांचे तैलचित्र संघाला भेट म्हणून दिले.

श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयाकरिता ह. भ. प. श्री. तुळजापूरकर, नागपूर यांनी दुर्मिळ संस्कृत-मराठी ४७ ग्रंथ भेट दिले.

श्रीमती इंदुताई केळकर यांनी परदेशातून ग्रंथालयाकरिता २५ इंग्रजी पुस्तकांची भेट पाठविली.

या वर्षीच्या कार्यक्रमांवर कळस चढविला गेला तो पुसद येथे घडवून आणलेल्या रौप्यमहोत्सवी साहित्य संमेलनानं. संमेलनाचे उद्घाटनासाठी

भारताचे संरक्षणमंत्री, माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण, प्रदर्शनाचे उद्‌घाटनाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, माननीय श्री. वसंतराव नाईक, अध्यक्ष म्हणून प्रा. वामनराव चोरघडे या त्रिमूर्तींचा लाभ झाला होता. संमेलनात "उद्याच्या साहित्याची चाहूल", "ज्ञानोबा ते विनोबा" आणि "ग्रामीण साहित्य" या विषयांवर अनुक्रमे प्रा. वा. ल. कुलकर्णी, डॉ. मा. गो. देशमुख आणि श्री. अण्णाभाऊ साठे यांचे अध्यक्षतेखाली परिसंवाद आयोजित करण्यात आले श्रीमती शांताबाई किर्लोस्कर यांचे अध्यक्षतेखाली लेखिका संमेलन, प्रा. वा. कृ. चोरघडे यांचे अध्यक्षतेखाली कथाकथन आणि श्री. आ. रा. देशपांडे उर्फ कवि अनिल यांचे अध्यक्षतेखाली कवि संमेलन हे कार्यक्रम यशस्वी रीत्या पार पडले. प्रा. गंगाधर गाडगीळ, प्रा. नरहर कुरुंदकर, प्रा. म. ना. अदवंत, सर्वश्री ह. रा. महाजनी, दि. के. बेडेकर, मुकुंदराव किर्लोस्कर, श्रीकांत राय, डॉ. द. ह. अग्निहोत्री, प्रा. वा. कृ. चोरघडे, प्रा. मधुकर केचे, कु. पुष्पा हेटे, प्रा. द. मा. मिरासदार, प्रा. राम शेवाळकर, श्री. उद्धव शेळके, श्री. मनोहर तल्हार, श्री. बाजीराव पाटील, सौ. इंदुमती गंधे, सौ. उषा लिमये, कु. सुगंधा शेंडे, भाऊ मांडवकर आणि वसंत सबनीस आदींचा या कार्यक्रमाच्या यशात फार मोठा वाटा आहे. आचार्य अत्रे आणि श्री ह. रा. महाजनी यांची भाषणे आणि पुसद शाखेने सादर केलेल्या श्री. पु. ल. देशपांडेकृत "अंमलदार"चा नाटचप्रयोग, सौ. माणिक वर्मा यांचे गायन आणि श्री. वसंत बापट यांनी सादर केलेला "बिनबियांचे झाड" या कार्यक्रमांनीही संमेलन गाजविले.

संमेलनाला जोडून "मराठीचे अध्यापन" या विषयावर डॉ. मा. गो. देशमुख यांचे अध्यक्षतेखाली एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. श्री. आ. रा. देशपांडे यांनी या सत्राचे उद्‌घाटन केल्यावर प्रा. वा. ल. कुलकर्णी प्रा. ग्रामोपाध्ये, प्रा. म. ना. अदवंत, प्रा. रा. व. माढेकर, प्रा. दि. के. बेडेकर, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. कृ. व्यं. पेशकार, सर्वश्री दाणी, कृ. ग. पाठक, केसकर आदी अधिकारी व्यक्तींनी या उद्‌बोधक चर्चेत भाग घेतला.

(अ) या संमेलनप्रसंगी पूर्वाध्यक्षांचा सत्कार करण्यात येऊन त्यांना श्रीफळ आणि शाल अर्पण करण्यात आली. (ब) संमेलनाचे खास वैशिष्ठ्य म्हणजे 'रौप्यमहोत्सवी स्मरणिका प्रसिद्ध करण्यात आली. (क) ग्रंथप्रदर्शनात यवतमाळच्या शारदाश्रमाचा दुर्मिळ ग्रंथसंग्रह, राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयातील ग्रंथसंग्रह, 'युसिस'चा ग्रंथसंग्रह, श्री. सोपानदेव पेन्शनवार यांचा नाणेसंग्रह, ठेवण्यात आला होता. (ड) संमेलनप्रसंगी फुलसिंग नाईक महाविद्यालयाचे वतीने पूस रीव्हर प्रॉजेक्टचा देखावा दाखविण्यात आला.

खुल्या अधिवेशनात महत्त्वाचे नऊ ठराव संमत झाले.

संमेलनाची सांगता श्रीक्षेत्र माहूरच्या सहलीने झाली.

ख्यातनाम साहित्यिक, मान्यवर नेते आणि फार मोठ्या प्रमाणावरील उपस्थिती यावरोबरच संमेलनाच्या यशस्वितेचे फार मोठे श्रेय संमेलन आयोजित करणाऱ्या स्वागतमंडळाला आणि अहोरात्र खपणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना आहे. प्राचार्य प्र. वा. ऊर्ध्वरेषे, श्री. सुधाकर नाईक, डॉ. द. शं. सरनाईक, श्री. ज. व्यं. पल्लेवार, श्री. दौ. ल. ऊर्फ अण्णासाहेब खडसे, श्री. अण्णासाहेब देशमुख, श्री. गोविंदराव पाटील आदी मंडळींचा या बाबतीत विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे.

याच वर्षी त्रैवार्षिक निवडणूक झाली. निर्वाचनाधिकारी, ॲडव्होकेट श्री. मु. ह. मुंजे यांनी ज्या कुशलतेने निवडणुकीत मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन !

संलग्न संस्था वृत्त

(१) विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर—

विदर्भ संशोधन मंडळ नागपूर ह्या संस्थेचे इ. स. ६४–६५ मध्ये एकूण ११० सभासद आहेत.

संस्थेची इमारत जवळ जवळ तयार होत आली असून पुढील वर्षी संस्थेचे कार्यालय स्वतःच्या वास्तूत जाणार आहे.

ग्रंथालयाकरिता महाराष्ट्र शासनाकडून १६ ग्रंथ सप्रेम भेट म्हणून मिळाले. कै. दा. ग. भावे जळगाव यांच्या पत्नीकडून १८ ग्रंथ भेट म्हणून मिळाले.

पुढील सन्माननीय व्यक्तींनी मंडळास भेट दिली.—

१. माननीय बाळासाहेब देसाई, गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य.
२. माननीय डॉ. एन्. एन्. कैलास, उपमंत्री शिक्षणविभाग, म. राज्य.
३. बॅ. नाथ पै, भारतीय लोकसभेचे सभासद.
४. श्री. रामप्रसाद मुखर्जी, सेवानिवृत्त जज्ज, कलकत्ता हायकोर्ट.
५. श्री. पी. जे. चिन्मुलगुंद सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(२) भारतीय भाषाध्ययन मंदिर—

संस्था स्थापन होऊन १८ वर्षे झाली. यावर्षी संस्थेच्या मालकीचे भवनस्थान झाले. दान व अनुदान एकूण १४२५ रुपये प्रतिवृत्ताच्या वर्षी संस्थेला मिळाले.

संस्थेच्या आंतरभारती ग्रंथालयातील एकूण ग्रंथसंख्या १३०० आहे. संस्थेच्या वतीने विभिन्न परीक्षांना बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे पुढीलप्रमाणे—

वि. सा. संघ परीक्षा — १७१ व राष्ट्रभाषा प्रचार समिती २०१, एकूण ३७२.

(३) रंजन कला मंदिर, नागपूर

(१) संस्थेतर्फे १९६३–६४ साली राज्यनाटयस्पर्धेत सादर करण्यात येऊन उत्कृष्ट ठरलेल्या 'वऱ्हाडी मानसं !' नाटकाचे दि. ५ एप्रिलला नागपूर आकाशवाणी केंद्रावरून त्याच संचात ध्वनिक्षेपण करण्यात आले.

(२) दि. १४ एप्रिल रोजी नगर येथील नाटयसंमेलनाचे अध्यक्ष श्री. पु. भा. भावे यांचा संस्थेच्या कार्यालयात सत्कार करण्यात आला.

(३) दि. ३० एप्रिल ६४ रोजी श्री. गो. नी. दांडेकर यांच्या 'मंदोदरी' या नव्या नाटकाचे वाचन संस्थेच्या सभासदांच्या आणि इतर निमंत्रितांच्या उपस्थितीत त्यांनी स्वतःच केले.

(४) दि. २३ मे रोजी महाराष्ट्र शासनाचे रु. २००० चे अनुदान संस्थेस मिळाले.

(५) दि. २३ ऑगस्ट रोजी 'शास्त्रीय चित्रपट गीत गायन स्पर्धा' हा अभिनव कार्यक्रम संस्थेतर्फे सादर करण्यात आला.

(६) दि. २२ ऑगस्ट रोजी 'चार एकांकिका' सादर करण्यात आल्या तर दि. २६ सप्टें. रोजी 'पं. नेहरूंच्या अष्टपैलू जीवनांतील विविध दर्शने' 'त्रिवेणी स्पर्धा' या संस्थेच्या लोकप्रिय कार्यक्रमांतून घडविण्यात आली. दोन्ही स्पर्धांतून रु. ११६७ ची एकूण रोख बक्षिसे वाटण्यात आलीत.

(७) दि. ३ आणि ४ ऑक्टो. रोजी संस्थेतर्फे 'वऱ्हाडी मान्सं !'चे दोन प्रयोग जबलपूर येथे करण्यात आले.

(८) दि. १५ ऑक्टो. रोजी विजयादशमीला संस्थेचा १४ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी शुभारंभ करण्यात आलेल्या 'चार कथा : एक व्यथा !' या नाटकाचा प्रयोग दि. २. डिसें. रोजी राज्य नाटयमहोत्सवाच्या प्रादेशिक स्पर्धेत सादर करण्यात आला.

(९) दि. १५ नोव्हें. रोजी 'रंगायन' या मुंबईच्या नाटयसंस्थेस त्यांच्या नागपुरातील मुक्कामात संस्थेत स्वागत आणि परस्परपरिचयास बोलावण्यात आले होते.

(१०) दि. २७ नोव्हें रोजी महाराष्ट्र राज्याच्या मनोरंजन समितीचे प्रमुख अधिकारी श्री. राजारामपंत हुमणे यांनी संस्थेला भेट दिली.

(११) दि. ३० नोव्हें रोजी 'चार कथा : एक व्यथा'चा प्रयोग केंद्रीय वस्तुसंग्रहालयाच्या शताब्दी समारोहात सादर करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे उपमंत्री डॉ. कैलास आणि श्री. मधुसूदन वैराळे यांनी याप्रसंगी संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

(१२) महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांनी दि. १२ डिसें. रोजी संस्थेच्या कार्यालयास ओझरती भेट दिली.

(१३) जाने. १४, १९६५ रोजी संस्थेच्या 'चार कथा : एक व्यथा' नाटकाचा प्रयोग मुंबई येथे अंतिम स्पर्धेत सादर करण्यात येऊन त्याला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

(१४) फेब्रु. १९६५ च्या पहिल्या आठवडयात इंदोर येथे तसेच ७ व्या मराठी नाटयसंमेलनात नांदेड येथे 'वऱ्हाडी मानसं !'चे प्रयोग करण्यात आले.

(१५) मार्चच्या प्रथम आठवडयात वार्षिक सभा होऊन नवी कार्यकारिणी निवडून आली.

(१६) मार्च अखेरीस संस्थेतर्फे 'चित्रपट दर्शनाचा' अभिनव कार्यक्रम घडवून आणण्यात आला.

याशिवाय नागपूर नाटयमंडळ, विकास-शिक्षण मंडळ (सांस्कृतिक विभाग) नागपूर, आणि सहकारी संस्था, नागपूर ह्या संस्था संघाच्या संलग्न संस्था आहेत.

शाखावृत्त

बुलढाणा

बुलढाणा येथे दि. १ जुलै ६४ रोजी वि. सा. संघाच्या सभासदांची सभा होऊन शाखा स्थापन करण्यात आली.

शाखेच्या मदतीसाठी दि. ३ ऑक्टोबर रोजी टिळक नाटयक्रीडा मंदिरात कै. शं. प. जोशीकृत 'खडाष्टक' नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला.

दि. ११-१०-६४ रोजी जालन्याचे प्रा. सुधाकर देशपांडे यांचे 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ' या विषयावर भाषण झाले.

दि. १८-१०-६४ रोजी लो. ना. डॉ. बापूजी अणे यांनी शाखेला भेट दिली व आशीर्वादपर भाषण दिल. याप्रसंगी श्री. ज. श्री. देशपांडे यांनी आपले काही निवडक गद्यलेखन वाचून दाखविले.

काटोल

काटोल शाखेची सभा दि. २२-१०-६४ रोजी झाली. यावेळी ६४-६५ सालाकरिता कार्यकारी मंडळ निवडण्यात आले.

दि. ५ डिसेंबर ६४ रोजी आचार्य अत्रे यांचे 'साहित्य' विषयावरील व्याख्यानमालेत पहिले व्याख्यान झाले.

दि. २३ जानेवारी ६५ रोजी विधानसभेचे अध्यक्ष माननीय बाळासाहेब भारदे यांचे भाषण झाले.

वर्धा

दि. २३-११-६४ रोजी प्रा. वि. उ. चांदूरकर यांचे 'आजच्या जागतिक राजकारणातील अणुस्फोट आणि घटस्फोट' या विषयावर भाषण झाले.

दि. ३० नोव्हेंबर रोजी श्रीज्ञानेश्वर पुण्यतिथीनिमित्त ग्रामीण महाविद्यालयातील प्रा. ज्ञा. स. पडोळे यांचे 'संतांच्या कार्याचे माहात्म्य' या विषयावर आणि यशवंत महाविद्यालयातील प्रा. वि. गं. कावळे यांचे 'एकनाथी भागवत' या विषयावर भाषणे झाली.

दि. १० डिसेंबरच्या रोजी आचार्य अत्रे यांचे भाषण झाले.

वणी

दि. १९-१०-६४ रोजी युगवाणीचे संपादक प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांचे अध्यक्षतेखाली कै. हरि नारायण आपटे यांचा जन्मशताब्दी उत्सव साजरा करण्यात आला.

कुही या गावी वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्यात आली. **गोंदिया**, **अमरावती** येथील शाखांची वार्षिक निवडणूक होऊन कार्यकारी सभासदांची निवड करण्यात आली. या व्यतिरिक्त यवतमाळ, आर्वी, चंद्रपूर (गोंडवन शाखा), पुसद, अकोला, उमरेड, खामगाव, वाशीम, नांदुरा, तळोधी, मेहकर या गावी संघाच्या शाखा आहेत.

विदर्भ साहित्य संघाला अनुदान

विदर्भ साहित्य संघाला महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून खालीलप्रमाण अनुदान प्राप्त झाले.

(अ) वार्षिक अनुदान	रु. ७५००
(ब) नाट्यसमिती करिता	रु. १०००

अनुक्रमणिका

(क) कै. हरिभाऊ आपटे जन्मशताब्दी उत्सवानिमित्त रु. १०००
(ड) लोकसाहित्य संपदा, (ग्रंथछपाईसाठी) रु. १६७०

विदर्भ साहित्य संघाला अन्य कामासाठी मिळालेल्या देणग्या—

(अ) डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या छायाचित्रासाठी म्हणून रु. २५ ची देणगी

(आ) कै. नानासाहेब जोग स्मारक निधीसाठी नागपुरातील नाटयसंस्था आणि व्यक्तिशः मिळून एकूण रु. २१३ ची देणगी मिळाली.

(इ) श्रीमती द्वारकाबाई विंझे यांनी कै. रा. सा. महादेव मारोतराव जोगळेकर त्यांचे स्मरणार्थ रु. १०१ ची देणगी दिली.

विदर्भ साहित्य संघ शासनाचा व इतर देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

आभार--

यावर्षी वि. सा. संघाचे कार्य पार पाडण्यास अनेक कार्यकर्त्यांचे, दात्यांचे, सभासदांचे आणि संस्थांचे सहाय्य झाले आहे. विदर्भ साहित्य संघ त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

आपले

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष

शं. वा. शास्त्री,
उपाध्यक्ष

म. ल. देशमुख
तु. ना. काटकर
भाऊ मांडवकर
चिटणीस

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस

विदर्भ साहित्य संघ,

तपशील			जमा	
	रु.	पैसे	रु.	पैसे
आरंभीची शिल्लक				
दि. बँक ऑफ महाराष्ट्र लि. (करंट)	४,७८७	२०		
(बिल्डिंग फंड)	४,७८५	१७		
(नाट्य संमेलन)	४५	६३		
(श्रीशिवाजी ग्रंथालय)	३६२	०३		
विदर्भ प्री. को-ऑ. हाउसिंग सोसायटी लि.	१,८०७	१६		
(प्रॉ. फंड)	१,२३१	०५		
मुदती ठेव	२१,५०१			
शिल्लक जवळ (धनादेश रु. ७,५००/-)	७,६२५	०९		
रंगमंदिर (धनादेश रु. २,०००/-)	२,१५५	२१		
			४४,२९९	५४
साधारण सभासद वर्गणी			१२,२०३	००
संलग्न संस्था			४०	
आजीव सभासद वर्गणी			१,०५२	
पुस्तक विक्री			२,१२५	३३
व्याज			३६७	१०
पुढे चालू			६०,०८६	९७

अनुक्रमणिका

नागपूर, १९६४–६५

तपशील	खर्च	
	रु.	पैसे
लो. ना. बापूजी अणे तैलचित्र	१६०	५०
उसनवार फंड	१५३	११
कै. रानडे वाद स्पर्धा	२३७	८५
श्रीशिवाजी ग्रंथालय तात्पुरते कर्ज (वि. सा. संघाकडून)	१०,४४७	२१
श्री खांडेकर सत्कार निधि–पारितोषिके	४००	००
निलंबित खाते	१२	००
वेतन खर्च	५,१०४	८७
दूरध्वनि	८२३	८०
डाक व्यय	५४३	०२
मुद्रण व लेखन सामुग्री	९१५	३०
युगवाणी मुद्रण	७,९४८	७७
वाहन व प्रवास खर्च	९५७	०२
किरकोळ खर्च	१०६	६६
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	१,४१८	५४
गडकरी स्मारक समिति	१००	३१
नाटच समिति व नाटच स्पर्धा	५४०	८३
आतिथ्य	४३७	८३
वीज खर्च	४७०	४७
परीक्षा समिति	५,०३१	९१
कार्यालयीन व्यवस्था व शाखा साहाय्य	९६५	१८
अधिकोष वर्तन	१२	३०
वस्तु खरेदी	२५३	५४
ग्रंथसंपादन व प्रकाशन	३८	१९
लोक साहित्य संपदा प्रकाशन	३,९३७	५०
पुढे चालू	४१,०१६	७१

अनुक्रमणिका

तपशील	जमा	
	रु.	पैसे
मागील पानावरून	६०,०८६	९७
परीक्षा शुल्क	६,२२३	७१
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	६६८	९९
देणग्या	३०१	
लो. ना. बापूजी अणे तैलचित्र देणगी	१०	
सरकारी अनुदान	७,५००	
कै. आपटे जन्मशताब्दि सरकारी अनुदान	१,०००	
किरकोळ उत्पन्न	४७९	३५
नाट्य समिति व नाट्य स्पर्धा (रु. १०००/- सरकारी अनुदान)	१,७०७	२५
डॉ. शं. दा. पेंडसे फोटो करिता	२५	
युगवाणी वर्गणी	२३३	
भविष्य निधि	११६	०७
कै. रानडे वाद स्पर्धा	३८५	
रंगमंदिराकडून वि. सा. संघास कर्ज	२,०००	
मुदती ठेवीवरील कर्ज (श्री शि. ग्रं.)	२,०००	
श्रीमंत पु. बा. काळे यांचे कडील कर्ज (श्री शि. ग्रं.)	२,०००	
पुढे चालू	८५,७३६	३४

अनुक्रमणिका

तपशील	खर्च	
	रु.	पैसे
मागील पानावरून	४१,०१६	७१
अंकेक्षण शुल्क	१००	००
शाखा अंशदान	२६५	००
चित्रशाला	२	००
गडकरी ग्रंथालय व पुस्तक खरेदी	६	००
कार्यकारी मंडळ निवडणूक	४,२८३	३१
समेलन	४९८	६०
मराठी साहित्य महामंडळ	४४९	३७
नाटय संमेलन	९९६	२३
कर्मचाऱ्यांचा भ. नि. चा वि. सा. संघ हिस्सा	१००	७५
श्री शिवाजी ग्रंथालय तात्पुरते कर्ज फेड	९४७	२१
सुरक्षा स्थितनिक्षेप	१२,६२२	४०
बांधकाम	१४,२५४	९८
कार्यालयीन खर्च	१४०	००
रंगमंदिर मुद्रण व लेखन सामुग्री	३७	२५
,, दूरध्वनि	२३६	६०
रंगमंदिर खर्च	३६९	९३
व्याज वि. सा. संघास दिले	३६०	००
वि. सा. संघास तात्पुरते कर्ज	२,०००	००
वस्तु खरेदी	५९६	७६
लाऊड स्पीकर्स	१,३३१	००
विद्युत् खर्च	५,००३	०६
वेतन	७,३८०	००
इमारतीचा विमा	५७८	१३
अधिकोष वर्तन	०	४४
बांधकाम	९,५८१	६५
नागपूर महानगरपालिका कर	४,१७५	९४
पुढे चालु	१,०७,३३३	३२

तपशील	जमा	
	रु.	पैसे
मागील पानावरून	८५,७३६	३४
श्री. खांडेकर सत्कार निधि	४००	००
वीज खर्च वसूली	१३९	
लोक साहित्य संपदा (सरकारी अनुदान)	१,६७०	
कै. नाना जोग स्मारक (दिव्यांच्या व्यवस्थेसाठी)	२१३	
श्री शिवाजी ग्रंथालय देणग्या, भाडे इत्यादि	२,९७५	३५
श्रीशिवाजी ग्रंथालय तात्पुरते कर्ज	१०,४४७	२१
बांधकाम साहित्य किंमत	५९७	५४
सुरक्षा स्थितनिक्षेप (श्री. जोग)	२,२८०	८०
बांधकाम जमा	१२,६२२	४०
रंगमंदिर भाडे इत्यादि	२७,२२६	१५
एकूण	१,४४,३०७	७९

अनुक्रमणिका

तपशील	रु.	पैसे	खर्च रु.	पैसे
मागील पानावरून			१,०७,३३३	३२
शिल्लकः—				
दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. (करंट)	१३४	१९		
(बिल्डिंग फंड)	२,०३८	२९		
(श्रीशिवाजी ग्रंथालय)	१,३००	७४		
विदर्भ प्री. को-ऑ. हाउसिंग सोसायटी लि.	९१४	२६		
(प्रॉ. फंड)	१,३४७	१२		
मुदती ठेव	२१,५०१	००		
वि. सा. संघ शिल्लक (धनादेश रु. ८,९५३-५०)	९,२४१	३९		
रंगमंदिर शिल्लक	४७७	४८		
श्रीशिवाजी ग्रंथालय (धनादेश)	२०	००	३६,९७४	४७
			१,४४,३०७	७९

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष

तपासले ते बरोबर आहेत
महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्
१६-७-१९६५

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य

(१-४ १९६४ ते ३१-३-१९६५) ३१ मार्च १९६५ ला

तपशील	व्यय	
	रु.	पैसे
वेतन खर्च	५,१०४	८७
दूरध्वनि	८२३	८०
डाक व्यय	५४३	०२
मुद्रण व लेखन सामुग्री	९१५	३०
युगवाणी मुद्रण	७,९४८	७७
वाहन व प्रवास खर्च	९५७	०२
किरकोळ खर्च	१०६	६६
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	१,४१८	५४
गडकरी स्मारक समिति	१००	३१
नाट्य समिति व नाट्य स्पर्धा	५४०	८३
आतिथ्य	४३७	८३
वीज खर्च	३३१	४७
परीक्षा समिति	५,०३१	९१
कार्यालयीन व्यवस्था व शाखा साहाय्य	९६५	१८
अधिकोष वर्तन	१२	३०
अंकेक्षण शुल्क	१००	००
शाखा अंशदान	२६५	००
चित्रशाला	२	००
कार्यकारी मंडळ निवडणूक	४,२८३	३१
संमेलन	४९८	६०
मराठी साहित्य महामंडळ	४४९	३७
नाट्य संमेलन	९९६	२३
श्रीशिवाजी ग्रंथालय कार्यालयीन खर्च	१४०	००
कर्मचाऱ्यांचा भ. नि. चा वि. सा. संघ हिस्सा	१००	७५
खर्चा पेक्षा उत्पन्न जास्त	९२२	८१
	३२,९९५	८८

संघ, नागपूर

संपणाऱ्या आय–व्ययाचा तक्ता

तपशील	आय	
	रु.	पैसे
साधारण सभासद वर्गणी	१२,२०३	
संलग्न संस्था	४०	००
पुस्तक विक्री	२,१२५	३३
ठेवीवरील व्याज	३६७	१०
परीक्षा शुल्क	६,२२३	७१
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	६६८	९९
देणग्या	३०१	००
सरकारी अनुदान	७,५००	
कै. ह. ना. आपटे जन्मशताब्दि सरकारी अनुदान	१,०००	००
किरकोळ उत्पन्न	४७९	३५
नाट्य समिति व नाट्य स्पर्धा (सरकारी अनुदान १,०००)	१,७०७	२५
युगवाणी वर्गणी	२३३	००
कै. रानडे वाद स्पर्धा	१४७	१५
	३२,९९५	८८

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष

तपासले ते बरोबर आहेत.
महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्
१६–७–१९६५

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य

३१ मार्च १९६५ चे स्थिति विवरण

फंड व लायबिलिटिज

		रु.	पैसे	रु.	पैसे
मंदिर निधि	मागील	२,४६,१८८	८८		
	यंदाचे	८,४८८	०४	२,५४,६७६	९२
सरकारी अनुदान	मागील			२,४१,९७३	००
तात्पुरते कर्ज	मागील			२,७५९	५०
व्यापारी देणे	मागील			४७,८९९	६७
अंकेक्षण शुल्क	यंदाचे			१००	००
आजीव सभासद	मागील	१०,५९६			
	यंदाचे	१,०५२		११,६४८	००
कै. बेहेरे व्याख्यानमाला	मागील			६,०००	००
श्रीगणेश व्याख्यानमाला	मागील			६,०००	००
श्री. खांडेकर सत्कार निधि	मागील			८,२०३	९५
कै. श्री. वरेरकर सत्कार	मागील			५८५	७१
श्रीशिवाजी ग्रंथालय देणग्या, भाडे इत्यादि	मागील	३४,०२२	१२		
	यंदाचे	२,९७५	३५	३६,९९७	४७
सरकारी अनुदान	मागील			३२,०००	००
श्री शि. ग्रं. तात्पुरते कर्ज	मागील	८,९४७	२१		
	यंदाचे	४,०५२	७९	१३,०००	
श्रीशिवाजी ग्रंथालय ठेकेदार स्थितनिक्षेप	मागील	१२,६२२	४०		
वजा	यंदाचे	१०,३४१	६०	२,२८०	८०
ग्रंथ प्रकाशन अनुदान	मागील	५३९	८४		
मराठी वर्णोच्चार विकास-वजा	यंदाचे	३८	१९	५०१	६५
		पुढे चालू		६,६४,६२६	६७

संघ, नागपूर

(बॅलन्स शीट)

असेट्स व प्रॉपर्टीज

		रु.	पैसे	रु.	पैसे
मंदिर रचना	मागील	५.४६,६८१	३८		
	यंदाचे	९,५८१	६५	५,५६,२६३	०३
टिनशेड व विहीर	मागील			५,३४१	८६
इमारत बांधकामाचा अग्रिमा	मागील			५,३६०	९६
उपस्कर व इतर सामान	मागील	११,९५०	७२		
	यंदाचे	१,५८४	५४	१३,५३५	२६
पुस्तके (गडकरी ग्रंथालय)	मागील	२,०३९	१२		
	यंदाचे	६	००	२,०४५	१२
लोक साहित्य संपदा प्रकाशन	यंदाचे	३,९३७	५०		
वजा	मागील	३,९२०	००	१७	५०
विद्युत् व दूरध्वनि स्थितनिक्षेप	मागील			२,०८१	००
कै. गडकरी तैलचित्र	मागील			३००	००
लो. ना. बापूजी अणे तैलचित्र	यंदाचे			१५०	५०
कै. नाना जोग स्मारक निधि	मागील			१,०७०	५५
श्रीशिवाजी ग्रंथालय बांधकाम	मागील	८६,३७९	०९		
	यंदाचे	१,०३५	०४	८७,४१४	१३
मुदती ठेव	मागील			२१,५०१	००*

	रु.	पैसे
*डॉ. शिगणापूरकर पारितोषिक	५००	००
स्थितनिक्षेप विदर्भ प्री. को-ऑ. हा. सोसायटी	११,००१	
बारा वर्षे नॅशनल प्लॅन सेव्हिंग्ज सर्टिफिकेट	२,०००	००
	१३,५०१	००

पुढे चालू ६,९५,०८० ९१

फंड व लायबिलिटिज

		रु.	पैसे	रु.	पैसे
मागील पानावरून				६,६४,६२६	६७
भविष्य निधि	मागील	१,२३१	०५		
	यंदाचे	११६	०७	१,३४७	१२
कै. नेने स्मारक फंड	मागील			७५	००
डॉ. शिगणापूरकर पारितोषिक	मागील			५००	००
निलंबित खाते	मागील	५२	६३		
वजा	यंदाचे	१२	००	४०	६३
डॉ. शं. दा. पेंडसे फोटो	यंदाचे			२५	००
कै. नाना जोग स्मारक (दिव्यांची व्यवस्था)	यंदाचे			२१३	
सामान्य निधि	मागील	४२,८०४	१५		
	यंदाचे	९२२	८१	४३,७२६	९६
				७,१०,५५४	३८

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष

ॲसेस्ट व प्रॉपर्टीज

	रु.	पैसे	रु.	पैसे
मागील पानावरून			६,९५,०८०	९१
	१३,५०१			
श्रीगणेश व्याख्यानमाला दहा वर्षे ट्रेझरी सेव्हिंग्ज सर्टिफिकेट	६,०००			
विश्वस्तांच्या नावे—"हिंदफिन"	२,०००	००		
	२१,५०१	००		
शिल्लक जमा खर्चाच्या तक्त्यात दाखविल्याप्रमाणे			१५,४७३	४७
			७,१०,५५४	३८

प्रमाणपत्रः—विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९६५ रोजी तयार असलेल्या स्थिति विवरणात वर दिलेले आकडे संघाच्या जमा खर्चाच्या पुस्तकाशी तंतोतंत जुळतात आणि ही पुस्तके आम्ही तपासली असून बरोवर आहेत असे आम्ही प्रमाणपत्र देतो.

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्
१६-७-१९६५

अनुक्रमणिका

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.

प्रकाशक मा. नी. गलगलीकर, विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १.